|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ५२ सोमवार दि. १८ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. २४ डिसेंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## ‘लिव्ह इन’ मधला प्रियकर हट्टाला पेटला प्रेयसीने अखेर रिक्षावाल्याचा जीव घेतला

संभाजी नगर/क्राईम रिपोर्टर

‘लिव्ह इन रिलेशनशिप’ म्हणजे केवळ व्यभिचाराचा बाजार! यात स्त्री पुरुषांनी एकत्र यायचे काही काळ मौजमजा करायची आणि दोघांचेही मन भरले कि वेगळे व्हायच. अशा संबंधांना समाज किंवा कायद्याची मान्यता नसल्याने ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ला अनैतिक मानले जाते. औरंगाबादमध्ये एक महिला तिच्या प्रियकर सोबत ४ वर्ष ‘लिव्ह इन रिलेशनशिप’मध्ये रहात होती. पण तिचा मुलगा मोठा झाल्यावर तिने हे संबंध तोडले. पण तिच्या ...पान ६ वर

# जमिनीसाठी पुतण्याच्या अंगात सैतान शिरला काकाचे शीर धडावेगळे करून गावभर फिरला!

सोलापूर (माढा)/क्राईम रिपोर्टर

कोणतेही वाद हे सामोपचाराने चर्चेतून मिटवायचे असतात. खास करून कौटुंबिक वाद जास्त वाढवायचे नसतात. कारण त्यातून निर्माण झालेली कटुता हानिकारक असते. ग्रामीण भागात जमिनीवरून वाद होत असतात. कधी कधी हे वाद मिटतात, तर काही वाद न्यायालयापर्यंत पोहचतात. आजही ग्रामीण न्यायालयात जमिनीचे शेकडो खटले प्रलंबित आहेत. पण कोर्ट कचेऱ्या करूनही जेंव्हा असे वाद मिटत नाहीत तेंव्हा मात्र माणसाची सहनशीलता संपते आणि वादाचे रूपांतर सूडाच्या भावनेत होते आणि एकदाका माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण झाली कि माणसाच्या अंगात सैतान संचारतो. अशावेळी तो दोस्ती-यारी, नाती-गोती कशाचाही विचार करीत नाही. त्याच्या डोक्यात एकच विचार असतो तो म्हणजे ज्या माणसाशी आपला वाद आहे, ज्याच्यामुळे आपल्याला त्रास झालाय त्याचा कसाही करून काटा काढायचा. अशावेळी जी माणसे अत्यंत क्रोधी असतात त्यांच्यात एक प्रकारची विकृती निर्माण होते आणि याच विकृती मधून त्याला ज्याच्यावर सूड उगवायचा असतो त्याची अमानुषपणे हत्या करण्याचे विचार त्याच्या मनात येतात. अशावेळी त्याचा संयम संपलेला असतो आणि संयमाची जागा विकृतीने घेतलेली असते. सोलापूर जिल्ह्याच्या माढामध्ये अशाच एका घटनेत चुलत्या- पुतण्यांमध्ये जमिनीचा वाद होता. हा वाद इतका विकोपाला गेला कि चिडलेल्या पुतण्याने कुऱ्हाडीचे घाव घालून चुलत्याची शीर धडावेगळे केले आणि ते शीर हातात घेऊन मोटार सायकलवरून गावभर फिरला. त्यामुळे गावकरी हादरून गेले. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.



सोलापूरमधील माढा तालुक्यात अतिशय धक्कादायक प्रकार घडला आहे. जमिनीच्या तुकड्यासाठी कुऱ्हाडीचे घाव घालून चुलत्याचा खून करून मुंडकं दुचाकीवर घेऊन एक माथेफिरू फिरत होता. त्याला अटक करण्यात आलीय. शिवाजी जाधव असं नराधमाचं नाव आहे. त्याने जमिनीच्या वादातून त्याचे काका शंकर जाधव यांचा खून केला. त्यांचं मुंडकं तोडून ते बाईकवर ठेऊन तो बाईकवर फिरत होता. अखेर अकलूज रोडवर माळीनगर इथे तो शरण गेला. या प्रकारामुळे माढा तालुक्यात भीतीचं वातावरण निर्माण झालेय. माढा तालुक्यातील शेवरे येथे जमिनीच्या तुकड्यासाठी एकाची हत्या करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे, चुलत्याचा कुऱ्हाडीचा घाव घालून निर्घृण खून करून मुंडके दुचाकीवर घेऊन तो गावभर फिरला. त्या नराधमाला पोलिसांनी ताब्यात




घेतले आहे. जमिनीच्या वादातून त्याने चुलत्याचे थेट मुंडके धडावेगळे केले आणि तेच मुंडके घेऊन तो दुचाकीवर फिरत होता. यानंतर त्याने अकलूज रोडवर माळीनगर येथे मुंडके व दुचाकी सोडून अकलूज पोलिसात शरण गेला. या प्रकाराने मात्र परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. सोमवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास शंकर प्रल्हाद जाधव (वय ६५) (शेवरे, माढा) असे खून झालेल्या वृद्ध इसमाचे नाव आहे. ...पान २ वर

# पती-पत्नीतील वाद प्राणावर बेतला लॉजवर नेवून पत्नीचाच जीव घेतला



कल्याण/क्राईम रिपोर्टर

पती-पत्नी मधील वाद हा काही नवीन नाही. मात्र दोघांनीही समजूतदारपणा दाखवायला हवा. अन्यथा कायमचा संसार तुटतो आणि जेंव्हा हा वाद विकोपाला जातो तेंव्हा मात्र त्यातून कोणतीही अनुचित घटना घडू शकते. कल्याणमध्ये राहणाऱ्या भूपेंद्र व ज्योती यांच्यात वाद सुरु होता, याच वादातून ज्योती त्याला सोडून माहेरी राहत होती. त्यामुळे भूपेंद्र अधिक चिडला होता. अखेर त्याने तिची समजूत काढण्यासाठी तिला लॉजवर बोलावले आणि तिची हत्या केली. पण पोलिसांनी अवघ्या २४ तासात आरोपी भूपेंद्रच्या मुसक्या आवळल्या.






अवघ्या १०-१२ दिवसांपूर्वी झालेल्या आई-मुलाच्या दुहेरी हत्याकांडामुळे कल्याण हादरलेलं असतानाच शनिवारी स्टेशनजवळच्या एका लॉजमध्ये महिलेचा मृतेदह सापडल्याने पुन्हा खळबळ माजली. मात्र महात्मा फुले पोलिसांनी सापळा रचून अवघ्या २४ तासांच्या आतच या हत्याकांडामागील आरोपीला बेड्या ठोकल्या. कौटुंबिक वादातून पतीनेच त्याच्या पत्नीला लॉजवर बोलावून तिची हत्या केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. आरोपी भूपेंद्र गिरी याला पोलिसांनी उस्मानाबादमधून अटक केली. कौटुंबिक वादाचा हा शेवट अतिशय हिंसक आणि धक्कादायक झाल्याने शहरात एकच खळबळ माजली. कल्याण स्टेशन परिसरातील तृप्ती लॉजमधील एका रूममध्ये एका महिलेचा मृतदेह सापडला. ज्योती तोरडमल असे त्या मृत महिलेचे नाव होते. ती घाटकोपर येथे रहात होती. शनिवारी दुपारच्या सुमारास ज्योती ही भूपेंद्र गिरी या इसमासोबत स्टेशन परिसरातील तृप्ती लॉजवर आली होती. मात्र रविवारी सकाळी बराच वेळ उलटूनही त्यांच्या रूमचा दरवाजा कोणीच उघडतं नव्हतं. त्यामुळे लॉजमधील कर्मचाऱ्यांनी दुसऱ्या किल्लीने दरवाजा उघडला तेव्हा त्यांना रूममध्ये ज्योतीचा मृतदेह आढळल्याने ते ...पान २ वर

# गरीब हमालाने केवळ लसून चोरली चोरीमुळे आयुष्याची घटका भरली

बोरिवली/क्राईम रिपोर्टर



मयत पंकज

आजकाल माणसाला छोट्या छोट्या गोष्टीवरून राग येतो आणि रंगाच्या भारत तो इतका बेभान होतो कि त्याच्या हातून काहीही घडू शकते. बोरिवलीत लसूण चोरल्याचा वादातून एका हमालाची हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मात्र या घटनेमुळे संपूर्ण मार्केटमध्ये खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

दुकानातून लसूण चोरली म्हणून बेदम मारहाण केल्याचा प्रकार बोरिवलीतून समोर आला आहे. घनश्याम आगरी या ५६ वर्षीय दुकानदाराने आपला कर्मचारी पंकज मंडल याला मरेपर्यंत मारहाण केल्याचा प्रकार समोर आला. यातच कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. यानंतर दुकानदाराला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानदार मूळचा बोरिवलीचा आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. गेल्या काही आठवड्यांमध्ये, घटत्या पुरवठामुळे काही भागात लसणाचे दर ४०० प्रति किलोपर्यंत पोहोचले आहेत. बुधवारी रात्री उशीरा लोडर म्हणून ...पान २ वर

# चुलत वहिनीला दिरानेच पटवले मन भरताच तिला मार्गातून हटवले

रत्नागिरी/क्राईम रिपोर्टर



मयत चैत्राली

अनैतिक संबंध केवळ शरीरसुखासाठी असतात. त्यामुळे अशा संबंधातून एकदाका मन भरले कि मग जिच्यासोबत असे संबंध असतात ती बाई त्या पुरुषाला नकोशी होते. खेडमध्ये रहाणार संदेश मेस्त्री याचे त्याच्याच चुलत वाहिनीशी अनैतिक संबंध होते. तिचा नवरा दारुडा असल्याने तिने आपल्यापेक्षा १६ वर्षांनी लहान असलेल्या आपला चुलत दीर संदेश बरोबर संबंध जुळवले. आपल्या लहान मुलासह संदेश बरोबरती रत्नागिरीला पळून गेली दोघेही पती पत्नी सारखे राहू लागले. पण संदेशाला ती हवी असली तरी तिच्या सोबत असलेला तिचा लहान मुलगा नको होता. त्यावरून दोघांमध्ये भांडणे व्हायची एकेदिवशी अशीच भांडणे झाली आणि चिडलेल्या संदेशाने अगोदर तिचे भिंतीवर डोके आपटले व नंतर ओढणीने गळा दाबून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संदेशाला अटक केली आहे.

रत्नागिरी खेड येथे निलेश मेस्त्री हा आपली पत्नी चैत्राली आणि तीन मुलासह राहयला होता. वयाच्या ३५शीतील चैत्राली ही देखणी आणि सुंदर होती. तीन मुलांची आई असली तरी अजून ती विशीतील तरूणीसारखी दिसत होती. निलेश हा ड्रायव्हर काम करीत असल्याने तो कामानिमित्य सतत बाहेर असायचा. त्याचे पत्नी चैत्रालीकडे लक्ष नव्हते. त्याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो घरी आला की चैत्रालीबरोबर कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण काढून



आरोपी संदेश

तिला मारहाण करीत होता. खेड येथे त्याच्या शेजारी संजय उर्फ संदेश धोडू मेस्त्री हा राहत होता. तो नात्याने निलेश याचा चुलत भाऊ लागत असल्याने त्याचे घरात येणे जाणे सारखे होते. वयाच्या १९शीत असलेला संदेश हा चुलत वहिनी चैत्रालीच्या प्रेमात पडला होता. त्याला ती आवडत होती. वहिनी, वहिनी करीत तो तिच्या सारखा मागे लाळ घोळीत होता. तिला ही तो आपल्या मागे का? लागला आहे हे तिने ओळखले होते. अलिकडे नवरा निलेश हा दारू पिऊन मारहाण...पान २ वर

# आंतरजातीय विवाहामुळे ठिणगी पडली मुलाच्या आईला विवस्त्र करून धिंड काढली



बेळगावी/क्राईम रिपोर्टर

ग्रामीण भागात आजही भयंकर जातीयवाद आहे. त्यामुळे जातीबाहेर जाऊन कुणी प्रेम केले, तर त्या प्रेमाला संपूर्ण समाजाचा विरोध असतो आणि याच विरोधातून पुढे ऑनर किलिंगच्या घटना घडतात. बेळगाव नजीकच्या वटमुरी येथे राहणाऱ्या अशोक व प्रियांका यांचे प्रेम होते. मात्र प्रियांका उच्चवर्णीय होती, तर अशोक हलक्या जातीतील होता. मात्र तरीही प्रियंकाने पळून जाऊन अशोक बरोबर लग्न केले. त्यामुळे प्रियांकाचे आई-वडील, भाऊ आणि समाजातले लोक इतके चिडले कि त्याने अशोकच्या घरावर हल्ला करून त्याच्या आईची विवस्त्र करून धिंड काढली व तिला भयंकर मारहाण केली. या प्रकरणी ७ आरोपींवर ऍट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. ...पान २ वर

# चारित्र्याच्या संशयामुळे त्याची मती गुंग झाली पत्नीला ठार मारून पतीनेही आत्महत्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर



संशय हा खूप वाईट असतो. कारण एकदाका संशयाचे भूत माणसाच्या मानगुटीवर बसले कि त्याचे मानसी स्वस्थ बिघडते. सतत त्याच्या डोक्यात तोच विषय घोळत असतो आणि त्यातूनच त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि याच सूडाच्या भावनेतून तो टोकाचा निर्णय घेतो. चांदवड तालुक्यातील परसूल येथे राहणाऱ्या भाऊसाहेब बर्कले याचा त्याची पत्नी सुनीताच्या चारित्र्यावर संशय होता. त्यामुळे सुनीता व भाऊसाहेब यांची नेहमी भांडणे व्हायची. एके दिवशी अशाच भांडणातून भाऊसाहेबाने सुनीताचा गळा दाबून मारले व आपल्यावर संशय येऊ नये म्हणून तिच्या तोंडात विष ओतले. इतकेच नाही तर स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण गाव हादरून गेले आहे.

संशय ही संसाराला लागणारी सर्वात मोठी किड आहे. संशयाने अनेक संसार बेचिराख केले आहेत. पत्नीच्या चारित्र्याचा संशय घेणारा पुरूष अक्षरश: माणसातून उठतो. आपल्या पत्नीचे परपुरूषाबरोबर अनैतिक संबंध असावेत हा अत्यंत भयानक विचार असून यातून आयुष्याची वाताहत झाल्याशिवाय रहात नाही. जन्माची सोबती असलेल्या पत्नीचा जीव घेऊन गजाआड होणाऱ्या पुरूषांची संख्या वाढत आहे, तर काही पुरूष पत्नीचा खून करतात आणि नंतर कायद्याच्या भीतीने किंवा पश्चातापाने स्वतःचे आयुष्यही संपवतात. मुलांना व घरच्यांना बेवारस करून जातात. याचेच दर्शन घडवणारी काळजाचे पाणी करणारी ...पान २ वर

# जमिनीच्या विक्रीवरून वाद वाढला दिराने वाहिनीचाच काटा काढला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर



मयत साधना

ग्रामीण भागात प्रामुख्याने शेतीवरून वाद होत असतात आणि हे वाद कुटुंबातील लोकांमध्ये आपसातच होत असतात. जरी गावातील पंचानी मध्यस्थी करून असे वाद मिटवले तरी धुसफूस कायम असते आणि त्यातूनच एखाद्याला जीव गमवावा लागतो. यवतमाळ जिल्ह्यातील मंगळूर येथे अशाच एका घटनेत साधना जोगे नावाच्या महिलेचा तिच्या दिरासोबत वाद होता. तिचा दीर नाना जोगे याला एक एकर जमीन विकायची होती. पण साधना ती जमीन त्याला विकायला देत नव्हती. अखेर नाना जोगे याने साधनांचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी नाना याला अटक केली आहे.

शेतात शेंगा तोडण्यासाठी गेलेली महिला दहा दिवसांपासून बेपत्ता होती. अखेर १० डिसेंबर रोजी तिचा मृतदेह शेतातील उसामध्ये आढळून आला होता. या प्रकरणी पोलिसांनी आता महिलेच्या दिरालाच बेड्या ठोकल्या आहेत. एक एकर शेतीच्या विक्रीमध्ये वहिनी आडकाठी घालत असल्याने तिचा गळा आवळून खून केल्याचे आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह शेतातील उसामध्ये फेकल्याचा धक्कादायक प्रकार पोलिस तपासातून पुढे आला आहे. यवतमाळ तालुक्यातील मंगरुळ येथील साधना संजय जोगे ...पान ६ वर

# जेवणाचे पार्सल घेण्यावरून वाद पेटला दोघांनी निष्पाप अनिलचा जीव घेतला

मुंबई/एस.कुमार

शुल्लक कारणावरून झालेले वाद सुद्धा माणसासाठी प्राणघातक ठरू शकतात. कारण आजकाल माणसाला पटकन राग येतो, तर काही ठिकाणी माणसाचा इगो हर्ट झाल्यावरही माणूस पेटून उठतो आणि मग मागचा पुढचा जराही विचार न करता काहीही करायला तयार होतो. चेंबूरमध्ये जेवणाचे पार्सल पहिले कोणी घ्यायचे यावरून झालेल्या वादात एका तरुणाला जीव गमवावा लागला. या प्रकरणी पोलिसांनी २ आरोपींना अटक केली आहे.



जेवणाचे पार्सल पहिलं कोण घेणार या वादातून चेंबूर येथे एका २२ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी चेंबूर पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यांच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र अशा क्षुल्लक कारणावरून एका उमद्या तरुणाची हत्या झाल्याने चेंबूर परिसरात खळबळ उडाली आहे. ८ आक्टोबर रोजी रात्रौ १०.४२ च्या सुमारास चेंबूरच्या विजय नगर परिसरात सुनील रणदिवे हा आपल्या मित्रा सोबत गप्पा मारत बसला होता. यावेळी त्याचा मित्र अन्नू मुजावर खान याचा त्यास फोन आला आणि त्याने फोन करून सांगितले की, तुझा भाऊ अनिल यास चेंबूर च्या आर. सी. मार्ग येथील सन्निधी बार या ठिकाणी ...पान ६ वर

18 TO 24 DECEMBER 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/16/2023 7:54 PM Page 1



पान १ वरून...

## जमिनीसाठी पुतण्याच्या अंगात सैतान...

या प्रकरणातील आरोपी नराधम शिवाजी जाधव या पुतण्याने हत्या केल्याचे समजताच त्याच्या तपासला विविध पथके पाठवण्यात आली. आता पोलिसांचा ससेमिरा चुकवणं अवघड असल्याचे लक्षात येताच या नराधमाने माळीनगर जवळ चुलत्याचे मुंडके आणि मोटार सायकल टाकून दिली. त्यानंतर अकलूज पोलीस ठाण्यात शरण गेला. दरम्यान अकलूज पोलिसांनी चुलत्याचे मुंडके , दुचाकी ताब्यात घेतले आहे. याबाबत मयताचा नातू नरहरी नवनाथ बंडलकर (वय २३) रा.कुरण वस्ती-शेवरे, ता.माढा याने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## पती-पत्नीतील वाद प्राणावर...

हादरलेच. त्यांनी या घटनेची माहिती तत्काळ महात्मा फुले पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांना दिली. पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला. तृप्ती लॉजमध्ये ज्योती तोरडमल हिचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी गुन्हा दाखल करीत पुढील तपास सुरु करत विविध टीम आरोपीच्या शोधात दोन पथक तयार करत आरोपीचा शोध सुरू केला होता. याच दरम्यान तांत्रिक बाबीसह सूत्रांच्या दिलेल्या माहितीनंतर कल्याण महात्मा फुले पोलिसांनी २४ तासाच्या आत सापळा रचत आरोपी भुपेंद्र गिरीला उस्मानाबाद मधून बेड्या ठोकल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भुपेंद्र हा मृत महिला ज्योतीचा पती असून त्या दोघात गेल्या पाट वर्षांपासून घरगुती वाद होता. त्यामुळे ते दोघे वेगवेगळे राहायचे. याचदरम्यान तिने घरी यावं यासाठी भूपेंद्रने वारंवार तगादा लावला होता, मात्र रोजचा वाद पाहून ज्योती हिने घरी येण्यास ठाम नकार दिला. अखेर संतापलेल्या भूपेंद्रने शनिवारी तिला तृप्ती हॉटेलमध्ये भेटण्यास बोलावले. लॉजच्या रुममध्ये त्यांच्यात पुन्हा वाद झाल आणि त्याने संतापाच्या भरात तिची हत्या केली आणि सामान आणण्याच्या बहाण्याने पळ काढला. मात्र पोलिसांनी त्याचा शोध घेत बेड्या ठोकल्या आणि तपासत सर्व माहिती उघड झाली. मयत ज्योती तोरडमल ही आपली पत्नी होती. मागील काही महिन्यांपासून आपण वेगळे राहत होतो, अशी माहिती आरोपी भूपेंद्र गिरी याने पोलिसांना दिली आहे. ज्योतीला मारण्याचे नक्की कारण काय आरोपीने सांगितले नसल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी सांगितले. तपासातून ही माहिती पुढे येईल. आरोपीला कल्याण न्यायालयात हजर केले आहे. त्याला न्यायालयाने शनिवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याचे वपोनि साळवी यांनी सांगितले. आरोपी गिरी शनिवारी ज्योतीला घेऊन तृप्ती लॉजमध्ये आला. तेथे त्याने कट रचून पत्नीची हत्या केली. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आरोपी आपण बाजारातून काही सामान घेऊन येतो असे लॉज व्यवस्थापकाला सांगून बाहेर पडला. त्यानंतर तो परत आला नाही. सकाळी लॉजचे कामगार गिरी राहत असलेला दरवाजा ठोठावू लागले. त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. दुसऱ्या चावीने दरवाजा उघडण्यात आला. त्यावेळी ज्योतीचा खून केला असल्याचे आढळून आले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.

## गरीब हमालाने केवळ लसून चोरली...

काम करणाऱ्या पंकजने लसूणची गोणी चोरताना पकडला गेला. त्यावेळी दुकानमालक घनश्याम आगरीने कर्मचाऱ्याला फुटपाथवर नेऊन मारले. ही मारहाण इतकी जबर होती की कर्मचाऱ्याच्या तोंडून रक्त वाहू लागले होते. अखेर तो कर्मचारी बेशुद्ध पडला. मारहाण केल्यानंतर कर्मचाऱ्याला फुटपाथवरच सोडल्याची कबुली घनश्यामने दिली. गुरुवारी सकाळी ६ च्या दरम्यान पोलिसांना याबद्दल माहिती कळविण्यात आली. कर्मचारी पंकज हा बोरिवलीतील एमटीएनएल बिल्डिंगजवळच्या फुटपाथवर बेशुद्ध अवस्थेत पडला असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याला शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले. पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मी कर्मचारी पंकज याला लसूणची गोनी घेऊन बाजारातून बाहेर पडताना पाहिले होते. तो आपल्या दुकानातून लसणाची भरलेली गोणी चोरण्याचा प्रयत्न करत असल्याचे माझ्या लक्षात आले. म्हणून त्याला मारहाण केल्याची कबुली घनश्यामने दिली. लोडरला मारहाण केल्यानंतर आगरीने त्याला जबरदस्तीने मार्केटमधून बाहेर काढले, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. चोरी करणारा पंकजा हा बेघर असून फुटपाथवर राहतो. घनश्यामने मारहाण केल्यानंतरही तो बाजाराच्या बाहेरील फुटपाथवर झोपला. दरम्यान आम्ही घनश्याम आगरी याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे आणि त्याला अटक केली असल्याची माहिती बोरिवली पोलीस ठाण्यातील एका पोलीस अधिकाऱ्याने दिली.

## चुलत वहिनीला दिरानेच पटवले...

करीत असल्याने ती त्याला जवळ घेत नव्हती. त्यामुळे नवरा बायकोच्या नात्यात दुरावा आला होता ही गोष्ट संदेशला माहित असल्याने तो सारखा चैत्रालीच्या मागे लागला होता. त्याला ही दारू पिण्याचे व्यसन असल्याचे तिला माहित होते. सुरूवातीला ती त्याच्या पासून चार हात लांब राहण्याचा प्रयत्न करीत होती. पण तरीही तो तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत होता. यात त्याला यश ही आले. ती त्याच्याशी गोड हसत खेळत बोलत त्याला लाईन ही देवू लागली. कालांतराने त्या दोघात ते संबंध प्रस्थापीत झाले. यातच दिवसामागून दिवस जात होते. निलेशच्या वागण्यात काही फरक पडत नव्हता. तो दारूच्या नशेत तिच्याशी भांडण काढून तिला मारहाण करू लागल्याने ती आपल्या तिन्ही मुलांना घेऊन पुणे कोथरूड येथे आपल्या माहेरी निघून आली. त्यामुळे संदेशच्या मनाची घालमेल वाढली. त्या दोघांचे संबंध बहरत असताना ती पुण्याला माहेरी गेल्याचे बघून संदेशच्या जीवाची घालमेल वाढली. त्याने तिच्याशी मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु ती त्याला उत्तर ही देत नव्हती. आता काय करायचे म्हणून संदेश विचारात पडला. गेल्या दोन महिन्यापूर्वी त्याने सरळ कोथरूड गाठले. तिला भेटून त्याने तिला गळ घातली. तु माझ्याबरोबर राह. मी तुझा सांभाळ करेन असे सांगितले. कोथरूड येथे ती आपल्या आई बहिणीसोबत राहयला असल्याने तिला काही करता येत नव्हते. काम करूनच तिला आपले पोट भरावे लागत होते. संदेश देखील दारू पित असल्याचे तिला माहित असल्याने ती त्याच्या सोबत राहयला तयार नव्हती. ती नाही होय करीत आहे आणि आपल्या सोबत यायला तयार नाही हे बघून संदेशने तिच्या तिन्ही मुलांना ठार मारेन अशी धमकी दिली. त्याच्या या धमकीला ती घाबरली आणि आपल्या लहान आठ वर्षीच्या एका मुलाला घेऊन ती त्याच्या सोबत आली. त्यावेळी त्या दोघांनी गोव्याला जायचे आणि तिथेच राहयचे असा निर्णय घेतला. परंतु रत्नागिरीत आल्यानंतर संदेशचा निर्णय बदलला. ती त्याच्या सोबत आली तरी तिला ठेवायचे कुठे असा प्रश्न त्याला पडला. कारण एक तर ती विवाहिता आणि तीन मुलांची आई होती. त्यामुळे समाजात आणि भाऊबंदात त्या दोघांना ही राहणे अवघड होते. म्हणून संदेश तिला घेवून रत्नागिरी सबनीसवाडी येथे भाडयाने खोली करून राहू लागला.दोघांच्या पोटापाण्यासाठी तो रत्नागिरी येथील एका भांडयाच्या दुकानात काम करू लागला. तो तिच्यासोबत राहत असल्याने त्या दोघात शरीरसंबंध ही निर्माण झाले. दारूच्या नशेत तो तिच्यावर तुटून पडत होता. तरणाबांड गडी आपल्या अंगावर खेळवायला तिला ही मजा वाटत होती. गेल्या महिन्या भरापासून ते दोघे सबनीसवाडा येथे भाडयाने राहत होते. आता त्याचे तिच्यापासून मन भरल्याने तो ही दारूच्या नशेत तिच्याशी भांडण काढून मारहाण करू लागला होता.तो तिला सांभाळू इच्छित होता परंतु तिच्या आठ वर्षीच्या मुलाला सांभाळ्याची त्याची इच्छा नव्हती. म्हणून भांडणात काही तरी कुरापत उकरून काढून तो तिचा छळ करीत होता.तो तिला तिच्या मुलाला नवऱ्याकडे सोड असे सांगत होता. तिची दोन मुले नवऱ्याकडेच असल्याने ती आपल्या लहान आठ वर्षीय मुलाला नवऱ्याकडे सोडायला तयार नव्हती. ती त्याच्यापेक्षा वयाने मोठी असल्याने त्याला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. शनिवार दि.९ डिसेंबर रोजी सकाळी कामाला जाण्याअगोदर तो तिला बाजारात घेऊन गेला. बाजारात त्याने चिकन आणि मासे खरेदी केले.त्यानंतर तो १०.३०च्या दरम्यान भांडयाच्या दुकानात कामाला गेला.दुपारी १.३० वाजता तो घराकडे जेवायला परत आला. त्यावेळी त्याला तिच्यासोबत शरीरसंबंध करावेत असे वाटले. त्याने कामावरून घराकडे येण्याअगोदर आपल्या घशाखाली एक क्वाटर रिचवली होती. दुपारनंतर कामावर जाण्याची त्याची इच्छा नव्हती. तिच्यासोबत शरीर संबंध करायचे आणि झोपून दिवस काढायाचा असे त्याने ठरविले. घरात आल्यावर त्याने तिच्या आठ वर्षीय मुलाला खेळायला बाहेर पाठविले. त्याला घरात तास दीड तासाने ये असे सांगितले. तो मुलगा बाहेर गेल्यावर त्याने दरवाजा लावून घेतला. त्याने दारू ठोसली आहे हे तिने ओळखले. त्या दोघांनी मजेत शरीर संबंध केले. त्यानंतर तो फ्रेश झाला. त्याला भूक लागली होती. तो तिला जेवण वाढ असे सांगत होता. परंतु ती तिच्याच नादात होती. ती काही एक ऐकत नसल्याचे बघून त्याला राग आला. तो तिला शिव्या देत, मी तुला पळवून आणली आहे. माझे तु ऐकत नाहीस म्हणून त्याने तिच्या डोक्याचे केस दोन्ही हातानी ओढले. त्या दोघांत भांडण सुरू झाले. ती ही त्याला शिव्या देवू लागली. तो तिला मारहाण करीत असताना त्याने तिचे डोके जोरात भिंतीवर आपटले. त्यासरशी ती बेशुध्द होऊन जमीनीवर पडली. त्यानंतर त्याने तिला हॉलमधून आतील खोलीत ओढत आणले. अजून त्याचा राग गेला नव्हता. दारूच्या नशेत असल्याने त्याची धुंदी उतरली नाही.आतील खोलीत आणून त्याने तिच्या गळ्याभोवती तिची ओढणी टाकली आणि तिचा गळा जोरात आवळला आणि तिला छप्पराच्या वाश्याला लटकवून तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला. एवढयावरच तो थांबला नाही पुढे त्याने ती मेली आहे की नाही हे पाहण्यासाठी चैत्रालीच्या पायाला स्टोव्ह पेटवून चटके दिले आणि ती मेल्याची खात्री केली. त्यानंतर तिच्या गळ्याभोवती असणाऱ्या ओढणीची गाठ सोडून तिला खाली उतरविले. त्यावेळी दुपारचे ३.३० वाजले होते. दरवाजा उघडून त्याने बाहेर खेळायला गेल्या मुलग्याला बोलावून घेत त्याच्या आईने गळफास घेत आत्महत्या केल्याचे सांगून आरडा ओरडा करायला सुरूवात केली.शेजारचे लोक जमा झाल्यावर त्यांना ही त्याने हेच सांगितले. या घटनेची माहिती त्याने शेजाऱ्याच्या मदतीने ११२ नंबर डायल करून सावंतवाडी पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पो.निरी ऋषीकेश अधिकारी, स.पो.नी. श्रीकांत इंगवले,उपनिरीक्षक गजानन भालेराव आनंद यशवंते, पो.हवा.रामदास जाधव, प्रसाद कदम, सतोंष गलोले यांनी भेट देवून पाहणी केली. मयताच्या गळयावर गळा आवळल्याच्या खुण तर डोक्याला मार लागल्याचे दिसत होते.पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सावंतवाडी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोस्ट मार्टम रिपोर्ट मध्ये मयताच्या डोक्याला मार लागल्याने रक्तस्त्राव होऊन मृत्यू असा उल्लेख होता. त्यानंतर पोलीसांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. मयत चैत्रालीच्या नवरा निलेश मेस्त्री आणि मयताची आई बहिण यांना बोलावून घेऊन पोलीसांनी या घटनेची माहिती त्यांना दिली. मयत चैत्राली ही गेल्या महिन्याभरापासून त्या संबंधातून चुलत दीर संदेश मेस्त्रीबरोबर राहत असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी संशयावरून संदेश मेस्त्रीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चैत्रालीच्या मृत्यूची चौकशी केली असता तो पोलीसाना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली .मयत चैत्रालीच्या आईच्या फिर्यादीवरून पोलीसांनी चैत्राली निलेश मेस्त्री (वय ३५) हिचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणे, धमकावणे, मारहाण करणे आदी गुन्हयाखाली संजय उर्फ संदेश धोंडू मेस्त्री (वय १९) याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला मंगळवार दि.१२ डिसेंबर रोजी कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडून मयत चैत्रीलीच्या गळ्यातील ओढणी, स्टोव्ह आदी जप्त केले.या घटनेचा पुढील तपास पो.निरी ऋषीकेष अधिकारी याच्या मार्गदर्शनखाली सावंतवाडी पोलीस करीत आहेत.

## आंतरजातीय विवाहामुळे ठिणगी ...

न्यु वंटमुरी येथे दुंडाप्पा उर्फ अशोक गडकरी हा २४ वर्षीय तरूण आपल्या आई-वडिल व आजीसह राहयला आहे. त्याचे वडिल ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करीत असल्याने ते सतत बाहेर गावी असतात. तो बेळगावी येथे एका कारखान्यात काम करून आपली गुजरान करीत होता. तारूण्य सुलभ भावनेने गावातील प्रियांका नावाच्या मुलीवर त्याचे प्रेम बसले. प्रियांका ही त्याला भेटायला येत होती. गेल्या दोन वर्षापासून त्याचे प्रेमसंबंध चालु होते. त्याचे प्रेम बहरत फुलत होते. अशोक याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच त्याची आई ही मोलमजुरी करीत होती. दोघांचे बरे चालले होते. अशोक हा खालच्या जातीतील तरूण असल्याने गावातील काही जण त्याच्या पासून आजही चार हात लांब राहत होत. अशातच अशोकचे गावातील नायक नावाच्या कुटूंबातील प्रियांका बरोबर प्रेम प्रकरण असल्याचे अनेकांना माहित होते. प्रियांका ही सवर्ण समाजातील असल्याने गावात तिच्या आई-वडिलांचा मान मरातब होता. त्याच्या शब्दाला वजन होते. परंतु त्याची मुलगी प्रियांका ही खालच्या वर्गातील अशोकच्या नादाला लागली असल्याने त्याची मानहानी होत होती. न्यु वटंमुरी येथे नायक याची भाऊबंदकी आणि समाज मोठा आहे. प्रियांका ही गावातील खालच्या जातीतील अशोक याच्या नादाला लागली असल्याचे तिच्या आई-वडिलांना समजल्यावर तिच्या आई-वडिलांनी तिला घरातून बाहेर पडण्यास ही मज्जाव केला. त्यांनी तिच्या मर्जी विरूध्द दुसरीकडे लग्न ही ठरवले. मात्र प्रियांकाचे अशोक वर मनापासून प्रेम असल्याने तीने ठरवून दिलेल्या मुलाशी लग्न करण्यास स्पष्टपणे आपल्या आई-वडिलांना नकार दिला. याचा राग तिच्या आई-वडिल आणि भावाला आला. त्यांनी अशोकला बोलावून तुला जर गावात राहयचे असेल तर आमच्या मुलीचा नाद सोड नाही तर त्याचे गंभीर परिणाम होतील अशी धमकी दिली. तरी ही अशोक आणि प्रियांका याची ताटातुट होत नव्हती. ती त्याला गुपचुपपणे भेटत होती. तिने ही त्याला काही झाले तरी मी तुझ्याशीच लग्न करेन असे सांगितल्याने अशोकला ही धीर आला. त्या दोघांचे मनापासून एकमेकांवर प्रेम असल्याने कितीही संकटे आली तरी त्यावर मात करायचे असे ठरवले. अशोक काही केल्या ऐकत नाही हे बघून प्रियांकाच्या भावाने आपल्या मित्राच्या मदतीने त्याला मारहाण केली. त्याला मारहाण केल्याचे बघून इकडे प्रियांकाने ही घरच्या लोकांना आपण विष पिऊन आत्महत्या करेन अशी धमकी दिली. त्यामुळे तिच्या आई वडिलांनी तिचे ठरलेले लग्न लवकरात लवकर उरकून टाकायचे असे ठरवले. लग्नाची तारीख ही फक्की केली. घरात लगीन घाई सुरू झाल्यावर प्रियांकाने अशोकशी गुपचुप संधान साधून आपण पळून जाऊन लग्न करूया असे त्याला सांगितले. तिच्या लग्नाच्या दोन दिवस अगोदर प्रियांका ही त्याच्याबरोबर रविवार दि.१० डिसेंबर रोजी कोणाला काही न कळात पळून गेली. त्यामुळे होता नव्हता तिच्या आई वडिलांचा रागाचा पारा चढला. मुलगी पळून गेल्याने नियोजीत पाहुण्यांना काय सांगायचे अशा पेचात ते पडले.त्याची गावात इतकी पथ असताना मुलगीने खालच्या जातीतील मुलाबरोबर पळून जाऊन त्याचे नाक कापले होते. त्यामुळे नायक कुटूंब सुडाने पेटले होते. दिवसभर त्यांनी त्या दोघांचा सगळीकडे शोध घेतला. परंतु त्याचा थांगपत्ता काही लागला नाही. अशातच प्रियाकांने आणि अशोकने लग्न करून घेतल्याची माहिती त्यांना संध्याकाळच्या सुमारास मिळाली. त्यामुळे आता काय करायचे असा प्रश्न त्यांना पडला. शोध घेऊन ही ते दोघे सापडत नसल्याने प्रियांकाच्या घरच्या लोकांनी व नायक कुटूंबातील लोकांनी रात्री ११च्या सुमारास अशोकच्या घरी जाऊन त्याच्या आईला दमदाटी केली. तुमच्या मुलाने आमच्या मुलीला पळवून नेले होते. ते दोघे कुठे आहेत त्याचा पत्ता सांग म्हणून अशोकच्या आईला मारहाण करीत तिला घराच्या बाहेर ओढत आणले. त्यावेळी घरात अशोक याची आई आणि वयोवृध्द आजी या दोघीच होत्या. घरातील सगळी भांडी कुंडी विस्कटून टाकत घराबाहेर टाकले. नायक कुटूंबाचा समुदाय मोठा असल्याने अशोकच्या भावकीतील लोक कुणी ही अशोकच्या सोडवायला आले नाही. त्यातच नायक कुटूंबातील लोकांनी अशोकच्या आईला नग्न करीत तिची घरापासून सुमारे १०० मीटर पर्यत नग्न धिंड काढली. तिला गावातील रस्त्यावरील एका डांबाला बांधून जबर मारहाण ही केली. ही घटना घडत असताना कुणी तरी या घटनेची माहिती जवळच असणाऱ्या काकती पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच काकती पोलीसांचा मोठा फौजफाटा न्यु वंटमुरी गावात सायरन वाजवितच दाखल झाला. गावात पोलीस आल्याचे बघून नायक कुटूंबातील लोकांनी तेथून पळ काढला. महिला पोलीसांनी नग्न महिलेच्या अंगावर वस्त्र टाकून तिची सोडवणुक केली. तिला जबर मारहाण झाल्याने तिच्या अंगावर मोठ मोठ्या जखमा झाल्या होत्या.ती पाणी पाणी म्हणतच एका महिला पोलीसाच्या मांडीवर बेशुध्द पडली. पोलीसांनी लागलीच तिला गाडीत घालून बेळगावी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. एव्हाना गावातील वातावरण भयभीत झाले होते. खालच्या समाजातील लोक भितीने पहाटेपर्यत गाव सोडून पळून गेले. ही घटना प्रेमप्रकरणातून झाल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. सोशल मिडियावर ही या घटनेची उलट सुलट चर्चा होत होती. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना घडल्याने संपुर्ण उत्तर कर्नाटकसह पश्चिम महाराष्ट्र ही हादरून गेला. काहीनी तर या घटनेला सवर्ण दलित असा रंग देण्याचा प्रयत्न केला. परंतु काकती पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करीत या घटनेतील सात संशयीत आरोपीच्या मुसक्या आवळून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

सध्या कर्नाटक विधानसभेचे हिवाळी अधिवेशन बेळगावी येथील सुवर्ण सौध येथे चालू असल्याने या घटनेचे पडसाद या अधिवेशनात पाहयला मिळाले. गृहमंत्री जी.परमेश्वर यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन न्यु वंटमुरी गावाला भेट दिली. तसेच गंभीर जखमी महिलेची बेळगावी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेऊन त्याच्या तब्येतची विचारपुस केली. तसेच या घटनेतील संशयीत आरोपीना सक्त शिक्षा होईल असे आश्वासन देऊन पळून गेलेल्या प्रेमी युगलांना सरकार संरक्षण देईल असे ही सांगितले. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर यांनी ही या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून मानव जातील काळीमा फासणारी ही घटना असून संशयीत आरोपीना शिक्षा व्हावी असे निर्देश पोलीसांना दिले. न्यु वंटमुरी गावाला पोलीस आयुकत एस.एन. सिध्दरामय्या, डीसीपी रोहन जगदीश यांनी भेट देवून पाहणी केली. कुठे ही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून पोलीसांनी गावात मोठा पोलीस फाटा तैनात केला. या घटनेतील संशयीत सात ही आरोपीनी आपला गुन्हा कबुल केल्याने त्याच्या विरोधात मारहाण आणि ॲन्ट्रासिटीचा गुन्हा दाखल करून त्यांना बेळगावी येथील न्यायालयात या सर्वाना पोलीसांनी उभे केले असता या सर्वाची रवानगी न्यालयाने हिडंलगा जेलमध्ये केली. दरम्यान या प्रेमी युगलांना सरकारने संरक्षण देण्याचे मान्य केल्याने अशोक व प्रियांका यांनी बेळगावी येथील पोलीस मुख्यालयात येवून आपण आपल्या मर्जीने पळून जाऊन लग्न केल्याचे पोलीसांना सांगितले. प्रेम लाभे प्रेमळाला त्याग ही त्याची कसोटी, क्षण पुरे प्रेमाचा अन वर्षाव पडो मरणाचा असे म्हटले जाते. प्रेमात अनेक अनंत अडचणीचा सामना प्रेमी युगलांना करावा लागत असतो. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना अशा प्रेमप्रकरणातून घडू नयेत नाहीत तर त्याचे वाईट परिणाम समाजमनावर व्हायला वेळ लागणार नाही एवढेच या घटनेवरून दिसून येते.

## चारित्र्याच्या संशयामुळे त्याची मती...

घटना नाशिक जिल्ह्यात घडली. संशयी पतीने पत्नीचा गळा दाबून खून केला. हा खून लपवण्यासाठी तिच्या तोंडात विषारी औषध ओतून आत्महत्येचा बनाव केला, त्यानंतर त्याने स्वत:ही आत्महत्या केली. केवळ संशयाने पती-पत्नी दोघांचेही जीवन संपले. देवळा तालुक्यातील उमराणे गावात लताबाई छोटीराम ठाकरे ही महिला आपली मुलगी पूनम हिच्यासह रहाते. मोलमजुरी करून ती आपला आणि मुलीचा उदरनिर्वाह करते. तिचे माहेर मालपाडा, ता.साक्री, जि.धुळे येथील आहे. दिवाळीचा सण आल्याने सणासाठी ती आपल्या मुलीला घेवून माहेरी म्हणजेच मालपाडा येथील तिचा भाऊ काळू मन्यासाराम गावित यांच्याकडे गेली होती. तो दि. २४ नोव्हेंबर २०२३ चा दिवस होता. लताबाई माहेरी आनंदात आपल्या भाऊ-भावजयीसोबत रमली असतांनाच एक वाईट बातमी तिच्या कानावर आली आणि सारे वातावरणच बदलून गेले. त्यादिवशी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास तिच्या बहिणीचा पती जयमला चौरे हा तिच्याकडे आला. त्याने घाबरत घाबरतच लताबाईला सांगितले की, मला आत्ताच चांदवड पोलिसांचा फोन आला होता. त्यांनी सांगितले की तुमची मुलगी सुनिता हिने तिच्या रहात्या घरी काहीतरी विषारी औषध घेतले आहे आणि आता ती जिवंत नाही. इतकेच नव्हे तर तुमच्या जावयानेसुद्धा बायकोने विषारी औषध घेतल्याने रहात्या घरी ओसरीमध्ये छताला गळफास घेतला आहे. आपल्या दाजीचे हे बोलणे ऐकून लताबाई मटकन खालीच बसली. तिला काहीच सुचेना झाले. ही बातमी ऐकल्याने घरातील, शेजारचे लोक गावित यांच्या घरी जमू लागले. लताबाईला त्यांनी धीर देण्याचा प्रयत्न केला. बातमी ऐकल्यानंतर धक्का बसलेली लताबाई आता सावरू लागली आणि ती मोठमोठ्याने रडू लागली. एव्हाना लताबाईच्या बहीणी आणि नातेवाईक त्याठिकाणी आले आणि त्यांनी लताबाईला चांदवड येथे जायला हवे असे म्हणून तिला तयार केले. त्यानंतर एक रिक्षा बोलावून घेतली, त्यामध्ये लताबाई आणि तिच्यासोबत नातेवाईक असून चांदवडला निघाले. लताबाई माहेरी आल्यानंतर तिला तिच्या मुलीबाबत ही वाईट बातमी समजली होती. खरे तर लताबाई सध्या उमराणे गावात रहात असली तरी तिला दिलेले तिचे मूळगाव हे साक्री डालुक्यातील सुकापूर आहे, मात्र धार वर्षापूर्वी पतीशी पटत नसल्याने तिने त्याच्यापासून फारकत घेतली आणि आपल्या दोन्ही मुलींना घेवून ती उमराणे, ता. देवळा येथे रहावयास आली. तिला दोन मुली आहेत. मोठी मुलगी सुनिता आणि धाकटी पूनम, आठ-नऊ वर्षापूर्वी सुनिताचा परसूल, ता. चांदवड येथील रहाणारे भाऊसाहेब एकनाथ बरकले याच्याशी आंतरजातीय विवाह झाला होता. सुनिता आणि भाऊसाहेब यांना तनुजा नावाची सात वर्षाची मुलगी आहे. रिक्षातून जात असतांना सुनिताबाबतच्या सगळ्या आठवणी लताबाईच्या मनात जाग्या झाल्या होत्या. अलिकडे तिचा नवरा भाऊसाहेब हा तिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचे तिला समजून आले होते. त्यातून तो तिचा छळ करत होता. या कारणातूनच आपल्या पोरीनं विष पिलं का? अशी शंका वारंवार लताबाईच्या मनात येत होती. परसूल येथे गेल्यावरच सगळ्या बाबी समजतील या आशेने लताबाई आपल्या नातेवाईकांसोबत निघाली होती. लताबाईसोबत तिची बहीण मनाबाई जयमल चौरे, मुलगी पूनम ठाकरे, बहीण देवकी देवमन गांगुर्डे आदी जण होते. चांदवडला पोहोचल्यावर त्यांना समजले की दोघांचे मृतदेह चांदवड येथील सरकारी रुग्णालयात आणले आहेत, त्यामुळे लताबाईसह सर्व जण चांदवड येथील सरकारी रुग्णालयात गेले. रुग्णालयात सुनिता व तिचा पती भाऊसाहेब यांचे मृतदेह ठेवले होते. लताबाई आणि इतरांनी मृतदेहाची पहाणी केली असता सुनिताच्या नाकातून व तोंडातून पांढऱ्या रंगाचा फेस आलेला होता. गळ्याला काळसर व्रण दिसत होता. भाऊसाहेब बरकले याच्या गळ्याला गळफास घेतल्याने काळसर खूण दिसत होती. दोन्ही मृतदेहांचे पोस्टमार्टम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले होते. त्याचा अहवाल चांदवड पोलिसांना सादर केला होता. पोलीस अधीक्षक शहाजा उमाप यांना या घटनेची माहिती देण्यात आली. त्यांच्या आदेशानुसार अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, मनमाडचे डी.वाय.एस.पी. सोहेल शेख यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेवून गुन्ह्याची माहिती घेतली. वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली चांदवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कैलास बाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र जाधव आणि इतरांनी या गंभीर गुन्ह्याच्या तपासास सुरूवात केली. सुनिताची आई लताबाई व इतर नातेवाईकांकडून समजले की भाऊसाहेब हा सुनिताच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यातूनच आपल्या पोरीने विष घेतले असावे अशी शंका लताबाईने पोलिसांसमोर व्यक्त केली होती. सुनिताने विषारी औषध घेवून आत्महत्या केली होती, पण पोलिसांना प्राप्त झालेला वैद्यकीय अहवाल वेगळेच काही सांगत होता. विषारी औषध घेवून आत्महत्या केल्याचा आभास निर्माण करण्यात आला होता. तसेच तेथे एक लिहिलेली चिठ्ठी मिळून आली. त्यात लिहिले होते की किरण नामक, इसमाने माझ्या बायकोला मारण्याची धमकी दिली आहे, त्यामुळे आम्ही दोघे जीव देत आहोत. ही चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली. अनैतिक संबंधाच्या संशयावरून ही घटना घडल्याचे स्पष्ट झाले होते, पण वैद्यकीय अहवालानुसार सुनिताचा मृत्यू गळा दाबून झाल्याचे स्पष्ट झाले होते.

पोलिसांनी नातेवाईकांकडून घेतलेल्या माहितीमध्ये असे समजून आले की भाऊसाहेब बरकले हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याशी वाद घालत असे. शुक्रवार दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी १ वाजता या कारणावरून पती-पत्नीमध्ये पुन्हा बाद झाला होता. हा वाद टोकास गेल्याने भाऊसाहेबने चिडून जावून रागारागात सुनिताचा गळा आवळून खून केला. या खुनाचा आपल्यावर संशय येवू नये म्हणून भाऊसाहेबने सुनिताच्या तोंडात विषारी औषध ओतले. तिने विषारी औषध पिवून आत्महत्या केल्याचा बनाव केला. त्यानंतर स्वतः घरासमोरील ओसरीतील छताला गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेची माहिती परसूलच्या पोलीस पाटील सोनाली सोनावणे यांनी चांदवड पोलिसांना दिली. पोलिसांनी मृतकाच्या घरच्यांची व नातेवाईकांची कसून चौकशी केली. यात भाऊसाहेब हा पत्नी सुनिता हिच्या चारित्र्यावर संशय घेत होता अशी माहिती मिळाल्यावर सुनिताची आई लताबाई ठाकरे हिने दिलेल्या फिर्यादीवरून तिचा पती भाऊसाहेब एकनाथ बरकले (वय ३५) (मयत) याच्याविरोधात चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४९१/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र जाधव यांच्याकडे सोपवण्यात आला. चांदवड पोलीस या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873


साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. १८ डिसेंबर २०२३ ते रविवार दि. २४ डिसेंबर २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# आचोळे तलावाकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष!

## तलाव परीसर अस्वछ; मासेमारी आणि बेकायदा पार्कींग





**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्व येथील आचोळे गावातील आचोळे तलाव मोठया प्रमाणात अस्वच्छ दिसत आहे. वसई विरार शहर महानगर पालिकेचे कार्यलय देखील येथे आहे. तलाव परीसरात सकाळी तसेच संध्याकाळीही फेरफटका तसेच लहान मंडळी खेळण्यासाठी बागडण्यासाठी येत असतात. मात्र खेळणी देखील तुटलेल्या अवस्थेत शेवटच्या घटका मोजत आहेत. महत्वाची बाब म्हणजे प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूला पुढे सरळ गेले असता तलावाचे कुंपण (लोखंडी) जाळी सहित पाण्यात पडले आहे. गेले दोन ते तीन महिन्या पासून तुटले आहे आणि तलावात पडलेल्या अवस्थेत आहे. मात्र पालिकेस सदर तुटलेली लोखंडी जाळी कुंपण पाण्यातले बाहेर काढण्यास मुहूर्त प्राप्त होत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. सदर ठिकाणी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तलावातील पाण्यात मोठया प्रमाणात कचरा आढळत आहे. सुरक्षा रक्षकाचा अत्ता पत्ता नाही. ठराविक ठिकाणी लाईट देखील नाही. तसेच तलाव परिसरात भटके जनावरे देखील फिरत असतात. मोठ्या प्रमाणात मासेमारी आणि मासे स्वच्छ करण्याचं काम देखील करण्यात येत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच काहीं वाहन चालक आपले दुचाकी वाहन घेऊन थेट तलाव परिसरातच चालवत असतात. त्यामुळे वसई विरार शहर महानगर पालिकेने सदर आचोळे तलावास पार्कींग झोन आणि मासेमारी केंद्र घोषित करण्यात येणार आहे का? महत्वाचे सदर तलावात पहारेकरी आहे का नाही? असल्यास पहारेकरीस सदर प्रकार दिसतो का नाही? पहारेकरी असेल तर तो दुर्लक्ष करीत आहे हे देखील स्पष्ट होत आहे.

# अभिनेत्रीचे ‘न्यूड व्हिडीओ’ केले व्हायरल!

## अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल






**विरार/प्रतिनिधी**

सिनेमात काम मिळवून देतो असे सांगून एका अभिनेत्रीचे ऑडीशनच्या नावाखाली अश्लील चित्रिकरण करण्यात आले. मात्र तिची दिशाभूल करून ते अश्लील बेवसिरीजमध्ये प्रसारीत करण्यात आले आहे. याप्रकरणी ३ जणांविरोधात अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास आता गुन्हे शाखा ३ कडे सोपविण्यात आला आहे. पीडित तरूणी १८ वर्षांची असून अभिनेत्री बनण्यासाठी मुंबईत आली आहे. सध्या ती वसईत भाड्याच्या घरात रहाते. हिंदी सिनेमा आणि बेवसिरीजमध्ये काम मिळविण्यासाठी ती विविध निर्मिती कंपन्यांकडे (प्रॉडक्शन हाऊस) भेटी देत होती. दरम्यान १ नोव्हेंबर रोजी तिला एका कंपनीतून दूरध्वनी आला होता. आम्ही नवीन बेवसिरीज तयार करत असून त्यासाठी मुलाखत (ऑडीशन) देण्यासाठी यावे लागेल असे या अभिनेत्रीला सांगण्यात आले. कामाच्या आशेपोटी ही तरूणी २ नोव्हेंबर रोजी तरूणी विरारच्या अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर गेली होती. तिथे तिला या प्रॉडक्शन कंपनीचे ४ जण भेटले. त्यात एक दिग्दर्शनक, एक कॅमेरामन, एक अभिनेता तसेच एक महिला मेकअप आर्टीस्ट अशा चौघांचा समावेश होता. चौघांनी तिला एका एका लॉजमध्ये ऑडीशनसाठी नेले. तिथे तिला काही दृश्ये चित्रित करायची आहेत असे सांगून तिला फसवून अश्लील दृश्य देण्यास भाग पाडले. ही केवळ ऑडीशनचा भाग असून तिचा कुठे वापर केला जात नांही. सिनेसृष्टीत असं कराव लागते असे तिला सांगितले. त्यामुळे या तरुणीचा नाईलाज झाला. मात्र यानंतर तिला या कंपनीमधील कुणाचाच कॉल आला नव्हता. दरम्यान, तिची दृश्ये विविध अश्लील संकेतस्थळावर प्रसारीत केल्या जाणाऱ्या अश्लील वेबसिरीजमध्ये टाकण्यात आल्याची माहिती तिला परिचितांकडून मिळाली. याबाबत तिने संबंधित लोकांना फोन केले. मात्र त्यांचे नंबर्स बंद होते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर तिने अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी फसवणूक तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनयिमाच्या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हे प्रकरण पुढील तपासासाठी गुन्हे शाखा ३ कडे वर्ग करण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी एक मोठा सेलिब्रिटी अशाच प्रकारे नवोदित अभिनेत्रींना फसवून त्यांची अश्लील चित्रफिती तयार केल्याच्या प्रकरणात गुंतल्याची मोठी चर्चा झाली होती. हा असाच प्रकार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणातील नवोदित तरुणींची फसवणूक करणारी टोळी कार्यरत आहे. या टोळीचे प्रॉडक्शन हाऊस देखील बनावट असून अनेक तरुणींची अशाप्रकारे फसवणूक केली असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# भिवंडीत ‘टोरेंट पॉवर कंपनी’तर्फे विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा व ऊर्जा संरक्षण जागरूकता अभियानचे आयोजन



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात वीज वितरण व वीजबिल वसूल करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनीतर्फे नागरिकांसह विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षा व ऊर्जा संरक्षण जागरूकता अभियानाचे आयोजन सुरू केले आहे. त्या अंतर्गत तालुक्यातील पडघा जवळील कुरुंद गावातील आदर्श विद्यालय याठिकाणी विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा संवर्धन या विषयावर जनजागृती सत्र आयोजित केले होते.

या जनजागृती सत्रात शिक्षक आणि शाळेच्या मुख्याध्यापकांसह सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सत्रासाठी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांमध्ये खूप उत्साह होता. या सत्रात अनेक विद्युत सुरक्षा उपकरणे आणि ऊर्जा संवर्धन पद्धती यांची माहिती सचित्र देण्यात आली. सत्रानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. ज्यामध्ये विजेत्यांना बक्षीसे सुध्दा देण्यात आली. शाळांमध्ये असे सत्र आयोजित करण्यामागचा टोरेंट पॉवरचा उद्देश मुलांना लहान वयाच्या प्राथमिक टप्प्यात विद्युत सुरक्षा सवयी लावणे हा आहे. असेच सत्र यापूर्वी एन.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल, ब्राह्मण आळी येथे आयोजित करण्यात आले होते.

# बिअर शॉपचा परवाना देण्यासाठी दुय्यम निरीक्षकाची ४ लाखांच्या लाचेची मागणी

**पालघर/प्रतिनिधी**



बिअर शॉपचा परवाना देण्यासाठी ४ लाखांच्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३ लाख ४० हजार रुपयांची लाच स्विकारण्याचे मान्य करणाऱ्या उत्पादन शुल्कचे पालघर येथील दुय्यम निरीक्षक नितीन संखे यांच्याविरुद्ध गुरुवारी पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संखे यांना ताब्यात घेतले असून त्यांच्या घराची झडती घेण्याचे काम सुरु आहे, असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) पालघर येथील पोलीस उप अधीक्षक दयानंद गावडे यांनी सांगितले. तक्रारदार यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे बिअर शॉपचा परवाना मिळावा यासाठी जानेवारीमध्ये उत्पादन शुल्कच्या पालघर कार्यालयात अर्ज केला होता. या कार्यालयातील दुय्यम निरीक्षक नितीन संखे यांनी या अर्जावर कार्यवाही करुन बिअर शॉपचा परवाना देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ४ लाखांची लाच मागितली. याबाबत तक्रारदाराने २० नोव्हेंबर रोजी एसीबीकडे तक्रार केली होती. एसीबीच्या पडताळणीमध्ये संखे यांनी चार लाखांची मागणी करून तडजोडीअंती ३ लाख ४० हजार रूपये स्विकारण्याचे मान्य केल्याची बाब स्पष्ट झाली. त्यामुळे संखे यांच्याविरुद्ध एसीबीने पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# भाईंदर येथील अभिनव महाविद्यालयात शेअर बाजार प्रशिक्षण



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर येथील अभिनव महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि वाणिज्यअर्थशास्त्र विभाग यांनी मुंबई स्टॉक एक्सचेंज ब्रोकर्स फोरमच्या सहकार्याने १३ ते १५ डिसेंबर २०२३ या कालावधीत भांडवली बाजार प्रशिक्षण या विषयावर विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत भारतीय भांडवली बाजार आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. तसेच भारतीय भांडवली बाजारातील गुंतवणूक ही बहुआयामी असते. विविध घटक गुंतवणुकीवर परिणाम करतात. या संबंधी सर्व संकल्पनाची स्पष्टता विद्यार्थ्यांना या कार्यशाळे मार्फत देण्यासाठी ह्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असणारे पायाभूत विश्लेषण तसेच तांत्रिक विश्लेषण या संबंधित माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई स्टॉक एक्सचेंज ब्रोकर्स फोरमच्या वतीने प्रा. सोनिया माशेलकर साधन व्यक्ती म्हणून लाभल्या. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक चौधरी, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बाळकृष्ण दळवी, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. नितीन सोनावणे, प्रा. राजेश सोनवणे, डॉ. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. शुभंकर रॉय उपस्थित होते. सदर तीन दिवसीय कार्यशाळेत अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# भिवंडीत चप्पल बूट साठवलेल्या गोदामाला आग




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्ट्यात आगीच्या घटना नियमित होत असताना शुक्रवारी दुपारी तालुक्यातील काल्हेर येथील श्री अरिहंत कंपाऊंड या गोदाम संकुलात स्पार्क या प्रख्यात चप्पल बूट निर्मिती कंपनीचे चप्पल बूट साठवलेल्या मॉर्डन फुटवेअर या गोदामास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशामक दलाची एक गाडी दाखल होत त्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. आग गोदामाच्या शेवटच्या टोकाला लागली असल्याने अखेर अग्निशामक दलाच्या जवानांनी भिंतीस चार ठिकाणी छिद्र पडून आगीवर नियंत्रण मिळविले आहे. दरम्यान आगीचे कारण अजून अस्पष्ट असून या आगीत लाखो रुपयांचे चप्पल बूट जाळून खाक झाले आहेत तर या गोदामा मध्ये कोणत्याही प्रकारचे अग्निरोधक यंत्रणा नसल्यामुळे ही आज मोठ्या प्रमाणात भडकली होती.

# वलांडीचे सुपुत्र पोलीस कर्मचारी सौदागर व तिपराळे यांचा पोलीस अधिक्षक सुमय मुंढे यांच्या हस्ते गौरव!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील वलांडी येथील भुमीपुत्र लतीफ पाशामीयाँ सौदागर व संदीप काशिनाथ तिपराळे या दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल शुक्रवारी त्यांचा लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सुमय मुंढे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. लतीफ पाशामीयाँ सौदागर हे औराद शहाजानी पोलीस ठाण्यात कार्यरत असून त्यांनी शिरुर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथील खुनाच्या घटनेत योग्य रित्या तपास केल्यामुळे खुनातील आरोपीला १० वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. याची दखल घेत पोलीस प्रशासनाच्या वतीने सौदागर यांचा गौरव करण्यात आला व तसेच संदीप काशिनाथ तिपराळे हे शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात कार्यरत असून त्यांनी निटूर येथील मुलीस चार वर्षापूर्वी पळवून घेऊन गेलेल्या फरार आरोपीच्या मुसक्या आवळल्या प्रकरणी पोलीस प्रशासनाच्या वतीने तिपराळे यांचा गौरव करण्यात आला. पोलीस दलात सौदागर व तिपराळे यांना गौरविण्यात आल्याने वलांडी पंचक्रोशीतून अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# एका अल्पवयीन मुलाला अंगावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न!

**अंबरनाथ/प्रतिनिधी**

अंबरनाथ मधील सिद्धार्थ नगर मध्ये एका अल्पवयीन मुलाने दुसऱ्या अल्पवयीन मुलाच्या अंगावर पेट्रोल टाकून आग लावल्याचा धक्कादायक प्रकार अंबरनाथ मध्ये घडला आहे, त्यामध्ये अकरा वर्ष मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी शासकीय छाया उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अंबरनाथ मधील सिद्धार्थ नगर परिसरातील घटना दोघेही अल्पवीन मुले खेळ खेळत असता घडला प्रकार. यामध्ये जखमी अकरा वर्षीय मुलगा हा आपल्या वयाच्या मित्रांसोबत खेळत होता आणि खेळ खेळामध्ये त्याच्या एका मित्राने त्याच्या वर पेट्रोल टाकले आणि दुसऱ्या ने त्याच्या अंगाला माचिस ची काडी पेटवून लावली. पेट्रोल अतिशय तीव्र ज्वलनशील द्रव्य आहे. अंगावरील शर्टपेट्रोल द्रव्याने भिजल्या मुळे लगेज आग पेटली. यावेळी जखमी मुलाने आग विझवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मात्र त्याला आग काही विझवायला जमले नाही. आणि आग विझवायला तो घरी आला. तेव्हा त्याच्या पालकांनी त्याचा जळत असलेल्या शर्ट वर पाणी टाकून ती आग विझविली. या घटनेत मुलगा गंभीररित्या भाजला असून त्याच्यावर छाया रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

# लातूर शहराचा पाणीपुरवठा आणि भूमिगत गटार योजनेसाठी ५६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी**

अत्यंत गतीने विकसित होत असलेल्या लातूर शहराची वाढती गरज लक्षात घेऊन मांजरा धरणापासून समांतर जलवाहिनीद्वारे शहराला अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यासाठी २ ५९.२२ कोटी रुपये तर शहरातील भूमिगत गटार बांधणीसाठी ३०५.१९ कोटी रुपये असे जवळपास ५६५ कोटी रुपये खर्चाची पहिल्या टप्प्याची योजना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून मंजूर झाली आहे. एकूण योजना जवळपास १२६५ कोटीची असून दुसऱ्या टप्प्यात या योजनांसाठी आणखी जवळपास ७०० कोटी रुपये मिळणार आहेत.

लातूर शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता आगामी सन २०५५ पर्यंतचा विचार करून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर महानगरपालिकेने शहर पाणीपुरवयासाठी ५५० कोटी रुपये खर्चाची योजना अमृत योजनेअंतर्गत शासनाकडे सादर केली होती, यात मांजरा धरणावर स्वतंत्र नव्याने पंप हाऊस उभारण्यापासून लातूरपर्यंत समांतर जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा समावेश आहे, सन २००४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून मांजरा धरणातून थेट पाईपलाईनद्वारे लातूरला पाणी आणण्याची योजना राबवण्यात आलेली आहे, या योजनेला आता जवळपास २० वर्षे पूर्ण होतआली आहेत. दरम्यानच्या काळात लातूर शहराच्या विस्ताराबरोबर लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

सदरील बाब लक्षात घेऊन आगामी २०५५ पर्यंतचा शहरवाढीचा विचार करून आमदार अमित देशमुख यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात ते पालकमंत्री असताना शहर पाणीपुरवठ्यासाठी नव्याने योजना आखण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५५० कोटी रुपये खर्चाची योजना तयार करून शासनाकडे सादर करण्यात आली होती, या योजनेतील पहिला टप्प्याला म्हणजे २५९. २२ कोटी रुपये खर्चाच्या योजनेला शासनाने आता मंजुरी दिली आहे. भूमिगत गटार योजनेसाठी ३०५ कोटी लातूर शहराचा वाढलेला विस्तार नव्याने निर्माण झालेल्या वस्त्या आणि आगामी काळात होणारा शहराचा विस्तार लक्षात घेऊन लातूर शहरात भूमिगत गटार योजना राबवण्यासाठी ७०० कोटी रुपये खर्चाची योजना आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेली आहे, या योजनेतीलही पहिला टप्प्याला म्हणजे ३०५.१९ कोटी रुपये खर्चाच्या योजनेला शासनाने आता मंजुरी दिलेली आहे, दोन्ही योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर मंजुरी मिळणार आहे, दोन्ही योजनांच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी आणखी जवळपास ७०० कोटी रुपये मिळणार आहेत, सदरील योजनेचे प्रस्ताव तयार झाल्यापासून आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रत्येक टप्प्यावर त्यासाठी सातत्याने पाठपुरावा आणि विनंती केली आहे, सदरील योजनांसाठी पहिला टप्प्यात जवळपास ५६५ कोटी मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस तसेच उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री श्री गिरीशजी महाजन यांचे तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी या सर्वांचे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आभार मानले आहेत.

# जिथे संसदच सुरक्षीत नाही...

या देशातील जनतेची सुरक्षा आता रामभरोसे आहे. असे म्हणायला काही हरकत नाही. कारण प्रचंड अशी सुरक्षा व्यवस्था असताना सुद्धा संसदेत दोन तरुण घुसतात आणि गोंधळ घालतात. त्यामुळे जिथे लोकशाहीचे मंदिर असलेली संसदच सुरक्षित नसेल. तिथे देशातील १४० कोटी जनतेचे काय? बावीस वर्षापूर्वी संसदेवर झालेला अॅटॅक देशातील जनतेने पाहिला होता. त्यामुळे लोकांमध्ये एक भीतीचे वातावरण होते. पण राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी मात्र भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, याबाबत आश्वासन दिले होते. पण पुन्हा तशीच घटना घडावी आणि तीही त्याच दिवशी! त्याच तारखेला! यासारखे दुर्दैव नाही. योगायोग असा की त्यावेळेसही भारतीय जनता पार्टीचे सरकार केंद्रात होते आणि आताही भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. त्यामुळे लोकांनी काय समजावे? डिसेंबर २०११ मध्ये संसदेवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. परंतु नऊ सुरक्षारक्षकांनी आपल्या प्राणाचे बलिदान देऊन संसदेवरील हा हल्ला परतवून लावला. त्या नऊ जणांच्या बलिदानामुळे एकाही खासदाराला किंवा मंत्र्याला दुखापत होऊ शकली नाही. संसद बचावली. परंतु त्यानंतर अशा प्रकारच्या घटनां भविष्यात घडू नयेत, यासाठी ज्या काही उपाययोजना करण्यात आल्या होत्या त्या किती तकलादू आहेत याची २२ वर्षानी प्रचिती आलेली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या हल्ल्याबाबत आपली जबाबदारी ओळखून भारतीय जनता पक्षाने देशाची माफी मागण्या ऐवजी, हे लोक आता विरोधी पक्षातील लोकांना टार्गेट करीत आहेत. कुणी म्हणत आहेत की यामध्ये तृणमूल काँग्रेसचा हात असावा. तर कोणी काँग्रेस पक्षावर आरोप करीत आहे. पण यात राजकारण आणणाऱ्यांनी या हल्ल्याच्या पार्श्वभूमीचा विचार करणे आवश्यक आहे. मुळात ज्या तरुणाने ही घटना घडवून आणली त्याना संसद किंवा संसदेत बसणाऱ्या खासदारांना कोणतीही दुखापत पोचवायची नव्हती. केवळ अशा प्रकारची दहशत निर्माण करून आपल्या मागण्यांकडे, संसदेचे, संसदेतील खासदारांचे आणि संपूर्ण देशातील जनतेचे लक्ष वेधून घ्यायचे होते. त्यासाठी त्यांनी संसदेचे अधिवेशन सुरू असताना अशा प्रकारे संसदेत घुसून स्मॉग अटॅक केला. मात्र तरीही त्यांचे हे कृत्य भयंकर असल्याने त्यांना शिक्षा व्हायला हवी. यात दुमत नाही. पण त्याचबरोबर या घटनेने पुन्हा एकदा सरकार विरुद्ध आजच्या तरुण पिढीमध्ये किती असंतोष आहे. हे दाखवून दिले आहे. भलेही एखाद्या पक्षाकडे प्रचंड बहुमत असले तरी, लोकांना विश्वासात न घेता सरकार जनतेच्या विरोधात कोणतेही निर्णय घेऊ शकत नाही आणि तसे घेतले तर त्याच्या परिणामाला सरकारला तोंड द्यावे लागू शकते. केंद्रात बहुमतात असलेल्या मोदी सरकारच्या विरोधात लोकांमध्ये निश्चितपणे असंतोष आहे. याचे कारण २०१४ मध्ये मोदी सत्तेवर आल्यापासून या देशात जातीयवाद वाढू लागला. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या मनात एक असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. याचे कारण बहुसंख्य समाज आणि त्या समाजातील काही जातीयवादी नेतेमंडळी दलित अल्पसंख्यांकांना हेतू पुरस्कार टारगेट करीत आहेत. त्यांच्या विरोधात प्रक्षोभक विधाने करीत आहेत. त्यांच्या धर्मस्थळाना टार्गेट केले जात आहे. मुस्लिम नाव असलेले रस्ते, चौक, शहरे यांची नाव बदलली जात आहेत. याची काहीही आवश्यकता नव्हती. तरीसुद्धा केवळ अल्पसंख्यांकांना हेतू पुरस्कार दुय्यम आणि पक्षपाती वागणूक दिली जात आहे. आणि ज्यांना हे सर्व मान्य नाही, असा एक मोठा धर्मनिरपेक्ष वर्ग सत्ताधारी भाजपावर नाराज आहे. ज्यामध्ये हिंदू सुद्धा आहेत. आणि अशाच नाराज समूहातून काही तरुणांनी सोशल मीडियावर एकत्र येऊन, संसदेत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला, असे आतापर्यंतच्या चौकशीत समोर आले आहे. या घटनेतून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे सरकारकडे कितीही मोठे बहुमत असले आणि या बहुमताच्या जोरावर त्यांच्याकडे अमर्याद असे अधिकार आलेले असले, तरी सामान्य माणसाला त्यांनी कमजोर समजू नये. कारण सरकार पेक्षा सामान्य माणसाची ताकद प्रचंड मोठी आहे आणि त्या ताकतीत बहुमताची सरकारे सुधा उखडून टाकण्याची हिंमत आहे. जेव्हा देशातील तरुणांच्या मनात सरकार विषयी असंतोषाची भावना निर्माण होते, तेव्हा तो तरुण कोणत्याही थराला जाऊ शकतो. संसदेवरील घुसखोरीच्या प्रकरणातून हेच समोर आलेले आहे. त्यामुळे सरकार किंवा विरोधी पक्षातील राजकीय नेते मंडळींनी या घटनेचे राजकारण न करता किंवा पकडण्यात आलेल्या तरुणांना फार मोठे दहशतवादी न समजता त्यांच्याविरुद्ध कायदेशीर मार्गाने कारवाई करावी. पण त्यांच्याकडे आकस आणि किंवा सूडबुद्धीने पाहू नये. कारण ते दहशतवादी नाहीत. पण तरीही त्यांचे कृत्य अत्यंत चुकीचे होते. नव्या संसद भावना बाबत लोकांच्या खूप अपेक्षा होत्या. ही वास्तू जुन्या संसद भावना पेक्षा कितीतरी पटीने चांगली, सुरक्षित आणि सुंदर असावी. असे लोकांना वाटत होते. आणि त्याच दृष्टीने या संसद भवनाची ६४००० वर्ग मीटर जागेवर चार मजली इमारतीच्या स्वरूपात निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यासाठी बाराशे कोटींचा खर्च आलेला आहे. अत्यंत अत्याधुनिक अशा सेवा सुविधा तसेच सुरक्षिततेचे उपाय या वास्तूमध्ये करण्यात आलेले आहेत .असे असताना या वास्तूमध्ये भरलेल्या पहिल्याच अधिवेशनात सुरक्षेतील त्रुटी चव्हाट्यावर आल्या ही अत्यंत गंभीर बाब आहे. संसद भवनात जाण्यासाठी सुरक्षेच्या तीन फेऱ्यांमधून जावे लागते. आतमध्ये प्रवेश करताना माणसांकडे असलेल्या वस्तूंची तसेच शरीराची स्कॅनिंग होते. असे असतानाही सागर शर्मा आणि मनोरंजन नावाचे दोन तरुण स्मोक स्प्रे घेऊन आत मध्ये घुसले कसे? त्यांनी आपल्या बुटांमध्ये लपवलेल्या स्मोकं स्प्रे स्कॅनिंग यंत्रावर स्कॅन कसे झाले नाहीत? ही खरोखरच सुरक्षेतील एक गंभीर चूक आहे. पण त्याच्यावर कोणी काही न बोलता राजकीय पुढारी आता एकमेकांवर आरोप करीत आहेत. हे अत्यंत संताप जनक आहे. पकडलेल्या आरोपींच्या प्रार्थमिक चौकशीत ते काही फार मोठे दहशतवादी संघटनांचे सदस्य नाहीत. हे उघडकीस आलेले आहे. त्यामुळे त्यांच्याकडे त्या अँगलने बघणे चुकीचे ठरेल. मात्र संसदेत घुसून दहशत निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न का होता यावरच तपासाचा अधिक फोकस असणे गरजेचे आहे. कारण या देशात असे लाखो तरुण आहेत की जे सरकारवर नाराज आहेत. सरकारच्या काही चुकीच्या गोष्टींच्या विरोधात त्यांना त्यांचा आवाज सरकार परत पोहोचवता येत नाही. म्हणून त्यातील काहीनी अशा चुकीच्या मार्गाचा अवलंब केला. त्यामुळे कायद्यानुसार त्यांना जी शिक्षा व्हायला हवी ती होईलच. पण त्याचबरोबर केवळ आपल्याकडे बहुमत आहे म्हणून कशा प्रकारची ही मनमानी करण्याची सरकारची जी प्रवृत्ती आहे ती त्यांनी बदलायला हवी. तुम्ही संसदेत जर लोकांचे प्रतिनिधी म्हणून बसत असाल, तर जनतेशी संबंधित असलेल्या कुठल्याही प्रश्नावर निर्णय घेताना जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय तुम्ही तुमचे निर्णय जनतेच्या गळी मारू नका. नोटबंदी, जीएसटी, शेतकऱ्यांच्या विरोधातील काळे कायदे यासारख्या गोष्टीमुळे लोकांमध्ये असंतोष आहे. आणि हा संतोष कुठल्याही मार्गाने व्यक्त जाऊ शकतो याचे सरकारने भान ठेवावे. आपल्या देशात लोकशाही आहे आणि लोकशाहीमध्ये लोकांचं मत निर्णायक असतं. लोकांच्या मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट जर एखाद्या सरकारने केली. तर त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतात. हे आजवर अनेक घटनांमधून बघायला मिळालेले आहे. त्यामुळे केंद्रातील बहुमताच्या सरकारने मनमानी करणे सोडावे. आणि कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी जनतेला विश्वासात घ्यावे. जेणेकरून त्या निर्णयाच्या विरोधात लोकांमध्ये असंतोष माजणार नाही. आणि त्यातून संसदेत घुसण्या इतपत लोकांच्या मनात चीड निर्माण होणार नाही. सरकारने कधीतरी सोशल मीडियावर सरकार विरुद्ध उमटणाऱ्या प्रतिक्रिया ही समजून घेण्याचा प्रयत्न करावा. त्याकडे दुर्लक्ष करू नये. कारण संसदेत घुसखोरीचा जो प्रयत्न झाला त्याची सुरुवात सोशल मीडियावरून झालेली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर सरकारच्या विरोधात किंवा सरकारच्या विषयी काय प्रतिक्रिया उमटत आहे याचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक आहे. बहुमत म्हणजे मनमानीचा परवाना नाही हेच सरकारने ध्यानात ठेवावे.

# लातूर जिल्ह्याला मिळाली नवी झळाळी

## ‘जीआय’मुळे तीन कृषी उत्पादनांना मिळाली राष्ट्रीय ओळख



लातूर म्हटलं की किल्लारी भूकंप, लातूर म्हटलं की रेल्वेनी पाणी आणलेलं... पण अनेक संकटाची मालिका येऊनही त्यावर मात करून नवनवे विक्रम प्रस्थापित करणारा लातूर जिल्हा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण आहे. लातूरचा शैक्षणिक पॅटर्न असो की लातूरचा आरोग्य पॅटर्न असो...कृषीच्या बाबतीत मात्र लातूरची ओळख तूर, सोयाबीन उत्पादनाचे आगार म्हणून आहे. कृषी क्षेत्रात नवे प्रयोग करणारा जिल्हा म्हणून लातूरची ओळख प्रस्थापित होत आहे. २९ नोव्हेंबर २०२३ रोजी भौगोलिक उपदर्शन पत्रिका Geographical Indications Journal मध्ये लातूर जिल्ह्यातील पानचिंचोलीच्या पटडी चिंचेला, बोरसुरी येथील बोरसुरी तूर डाळीला आणि आशिव येथील कास्ती कोथिंबीरला भौगोलिक मानांकन (जीआय) मिळाल्याचे प्रसिद्ध झाले. पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी याविषयी आनंद व्यक्त केला आहे. एखाद्या विशिष्ट वस्तूशी निगडीत मानांकन वा चिन्ह ज्याचा संबंध भौगोलिक स्थान किंवा उगमस्थानाशी (उदा. शहर, प्रदेश, देश) असतो त्या मानांकनास भौगोलिक मानांकन असे म्हणतात. भारत जागतिक व्यापार संघटनेचा एक भाग असल्याने १५ सप्टेंबर २००३ पासून मालाचे भौगोलिक मानांकन (नोंदणी आणि संरक्षण) कायदा, १९९९ लागू करण्यात आला. भौगोलिक मानांकनामुळे, भौगोलिक मानांकनप्राप्त वस्तूचे नाव अधिकृत वापरकर्त्याव्यतिरिक्त इतर कोणीही वापरू शकत नाही. २००४– २००५ साली दार्जिलिंगच्या चहाला भारतातले पहिले भौगोलिक मानांकन मिळाले होते. लोकांना जी. आय. मानांकन काय आहे. हे कळावे म्हणून यावर लिहलेला हा सविस्तर लेख.

**भौगोलिक चिन्हांकन (जी.आय.) म्हणजे काय?**

भौगोलिक चिन्हांकन (जी.आय.) हे त्या विशिष्ट परिसरातील मूळ कृषीविषयक, नैसर्गिक किंवा उत्पादित माल ओळखण्यासाठी वापरतात. या मालाचा उगम त्या विशिष्ट प्रदेशातीलच असतो. जी. आय. मानांकन हे एखादी वस्तू अथवा पदार्थ अथवा उत्पादन हे खास दर्जाचे किंवा एकमेवाव्दितीय असल्याची पावती आहे.

**जी. आय. नोंदणीचे फायदे कोणते?**

जी. आय. मानांकनप्राप्त उत्पादनांना कायदेशीर संरक्षण मिळते. मानांकनप्राप्त उत्पादनाच्या नोंदणीकृत उत्पादकांशिवाय होणाऱ्या जी. आय. मानांकनाच्या अनाधिकृत वापरावर पायबंद घालता येतो. जी. आय. मानांकनप्राप्त उत्पादनांच्या निर्यातीला कायदेशीर संरक्षणाखाली चालना मिळते. उत्पादकांच्या आर्थिक समृद्धीला चालना मिळते. जागतिक व्यापार संघटने’च्या इतर सदस्य देशांमध्ये कायदेशीर संरक्षण मिळवण्यास यामुळे मदत होते.

**जी. आय. नोंदणीसाठी कोण अर्ज करू शकतो?**

कायद्याने किंवा कायद्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेली कोणतीही संस्था, संघटना, अधिकारी यंत्रणा किंवा कोणताही उत्पादक यांच्यापैकी कोणीही जी. आय. नोंदणीसाठी अर्ज करू शकते. जी. आय. नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने उत्पादकांच्या हिताचेच प्रतिनिधित्व करणे आवश्यक असते. विहित नमुन्यातच अर्जदाराने अर्ज करणे गरजेचे असते. हा अर्ज नोंदणी अधिकारी, भौगोलिक निर्देशन कार्यालय, चेन्नई यांच्याकडे विहित शुल्कासह पाठवला जाणे आवश्यक असते.

**जी. आय. मानांकनाचा नोंदणीकृत मालक कोण असतो?**

काही लोकांनी, उत्पादकांनी अधिकृतरित्या स्थापन केलेली संघटना किंवा कोणतीही अधिकृत यंत्रणा जी. आय. उत्पादनाची नोंदणीकृत मालक असते. जी. आय. मानांकनाचे ‘नोंदणीकृत मालक’ म्हणून त्यांचे नाव जी. आय. मानांकन नोंदवहीत दाखल केलेले असले पाहिजे.

**जी. आय. मानांकनाचा अधिकृत वापरकर्ता कोण असतो?**

नोंदणीकृत जी. आय. मानांकनप्राप्त वस्तूंचा अधिकृत वापरकर्ता म्हणून त्या वस्तूचे उत्पादन केलेला उत्पादक असतो.

**जी. आय. मानांकनासंदर्भात उत्पादक कोण असतो?**

उत्पादक हे तीन प्रकारचा माल हाताळणाऱ्या व्यक्ती असतात. शेतमालाचे उत्पादन करणारे, त्यावर प्रक्रिया करणारे, त्याचा व्यापार किंवा व्यवहार करणारे.

**जी. आय. नोंदणी करणे सक्तीचे आहे का?**

जी. आय. नोंदणी करणे सक्तीचे नाही. मात्र नोंदणी केल्यामुळे कायदेशीर उल्लंघनाच्या वेळी कारवाई करण्यासाठी अधिक चांगले कायदेशीर संरक्षण प्राप्त होते.

**नोंदणीकृत जी. आय.चा वापर कोण करू शकते?**

नोंदणीकृत जी. आय. वापराचे सर्व अधिकार अधिकृत वापरकर्त्यालाच असतात.

**जी. आय. नोंदणी किती काळापर्यंत वैध असते? तिचे नूतनीकरण करता येते का?**

जी. आय. नोंदणी ही दहा वर्षांसाठी केली जाते. त्यापुढे दर दहा वर्षांसाठी आपण सातत्याने नोंदणीचे नूतनीकरणही करू शकतो. जर नोंदणीकृत जी. आय.चे नूतनीकरण झाले नाही, तर नोंदवहीमधून त्याची नोंद काढून टाकली जाते.

**नोंदणीकृत जी. आय.चे उल्लंघन झाले असे कधी म्हटले जाते?**

जी. आय.प्राप्त मालाच्या मूळ भौगोलिक परिसरासंदर्भात दिशाभूल केली जाते, त्या वेळी नोंदणीकृत जी. आय.चे उल्लंघन झाले असे म्हटले जाते. एखादे उत्पादन ज्या जी. आय.शी संबंधित असते, त्याऐवजी ते उत्पादन दुसऱ्याच भौगोलिक चिन्हांकनाचे प्रतिनिधित्व करत असल्याची चुकीची माहिती जाते, त्या वेळीही नोंदणीकृत जी. आय.चे उल्लंघन झाले असे म्हटले जाते.

**उल्लंघनासंदर्भातील कारवाई कोण सुरू करू शकते?**

जी. आय.चे नोंदणीकृत मालक किंवा अधिकृत वापरकर्ते उल्लंघनासंदर्भातली कारवाई सुरू करू शकतात.

**नोंदणी झालेल्या जी. आय.च्या मालकीचे हस्तांतरण, संक्रमण (प्रेषण) इत्यादी करता येऊ शकते?**

जी. आय. ही सार्वजनिक मालमत्ता असते. ती संबंधित मालाच्या उत्पादकांच्या मालकीची असते. तिची मालकी दुसऱ्यांना देणे, तिचे संक्रमण (प्रेषण) करणे, परवानाकरण (Licensing), गहाण ठेवणे, प्रतिज्ञापत्र करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारे या सार्वजनिक मालमत्तेच्या बाबतीत करार करणे शक्य नसते. मात्र जर अधिकृत वापरकर्त्याचा (जी. आय.ची नोंदणी करताना त्या अर्जावर जिचे नाव आहे, अशा व्यक्तीचा) मृत्यू झाला, तर त्याने नमूद केलेल्या त्याच्या वारसाला त्याचे हक्क प्राप्त होतात.

**एखाद्या उत्पादनाला मिळालेले जी. आय. किंवा त्या जी. आय. उत्पादनाचा अधिकृत वापरकर्ता यांची नोंद नोंदवहीतून काढून टाकता येते का?**

एखाद्या उत्पादनाचा जी. आय. किंवा त्या उत्पादनाचा अधिकृत वापरकर्ता म्हणून असलेल्यांची नोंद नोंदवहीमधूनमधून काढून टाकण्याचे अधिकार अपिलीय मंडळाला किंवा भौगोलिक निर्देशन कार्यालयाच्या नोंदणी अधिकाऱ्याला (रजिस्ट्रारला) असतात. हा आदेश समजल्यापासून तीन महिन्यांच्या आत यासंदर्भातली याचिका संबंधित व्यक्ती दाखल करू शकते.

**जी. आय. हा ट्रेडमार्कहून (व्यापारचिन्हाहून) कशा प्रकारे भिन्न आहे?**

ट्रेडमार्क (व्यापारचिन्ह) हे व्यापारासंदर्भात वापरले जाणारे चिन्ह आहे. हे चिन्हांकन एका उद्योगाचा माल किंवा त्याची सेवा यांना इतर उद्योगांपासून वेगळे बनवते. मात्र जी. आय.चा वापर विशिष्ट भौगोलिक परिसरातील खास गुणधर्म असलेला माल ओळखण्यासाठी केला जातो.

महाराष्ट्रातील नऊ उत्पादनाला भौगोलिक मानांकन मिळाले आहेत. त्यातले तीन लातूरचे असल्यामुळे लातूरकरांना विशेष आनंद झाला आहे. या मानांकनामुळे या तीन उत्पादनाला मोठी राष्ट्रीय ओळख निर्माण होईल आणि उत्पादनाला मोठी चालना मिळेल.राष्ट्रीय बाजारात मागणी वाढेल. त्यासाठी दर्जा राखण्याचे आव्हान असेल. हा दर्जा निश्चित राखला जाईल, अशी अपेक्षा लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक पी.डी. हनबर यांनी व्यक्त केली आहे.

**– युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# सोशल मीडियावरील गैरप्रकार रोखण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म -उपमुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर/प्रतिनिधी**



‘महादेव अप’ या ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या विरोधात विविध राज्यात दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने अंमलबजावणी संचालनालयाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच राज्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील अशा प्रकारचे गुन्हे आणि गैरप्रकार रोखण्यासाठी आता राज्य शासन डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. सदस्य अॅड. आशिष शेलार यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महादेव अॅप ही मूळ कंपनी स्थापन करण्यात आली. त्यानंतर ६७ वेगवेगळ्या वेबसाइट्स तयार करण्यात आल्या. या वेबसाइटचे मालक वेगवेगळे असले तरी त्यांची भागीदारी या महादेव अॅप मध्ये असल्याचे आढलून आले. मात्र, या पची नोंदणी ही दक्षिण अमेरिकेत करण्यात आल्याचे निदर्शनास आले. राज्यातील दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने यात कोणाकोणाची गुंतवणूक आहे, हा पैसा कुठून आला आहे, याचा तपास विशेष पथक करीत आहे. याप्रकरणी दोन महिन्यांत कार्यवाही करण्यात येईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिली. ऑनलाईन गेमिंग च्या जाहिराती अनेक नामांकित व्यक्ती करत असल्याचे दिसते. त्यांनी अशा जाहिराती टाळाव्यात. तसेच या ऑनलाइन गेमिंग संदर्भात काही प्रतिबंधात्मक अथवा नियंत्रण आणणारी पावले केंद्र सरकारने टाकावीत, अशी विनंती केंद्र शासनाला केली जाईल. त्यानंतर यासंदर्भात उशीर होत असेल, तर राज्य शासन राज्यापुरती अशी नियमावली निश्चितपणे करेल, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. राज्य शासन सध्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म संदर्भात एकत्रित धोरण आणत आहे. त्यात तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे सहकार्य घेतले जात आहे. यासंदर्भात राज्य शासनाने निविदाही प्रसिद्ध केली असून पुढील वर्षाच्या एप्रिल मे महिन्यापर्यंत हा प्लॅटफॉर्म तयार होईल. त्यामुळे ऑनलाईन गेमिंग, डीपफेक अशा आव्हानांना आपण सामोरे जाऊ शकू, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. यावेळी सदस्य बच्चू कडू, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, अॅड. वर्षा गायकवाड आणि आदित्य ठाकरे यांनी चर्चेत सहभाग घेतला.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत सन २०२४ मध्ये होणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी**


महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) सन २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. आयोगामार्फत जाहिरात प्रसिद्ध केलेल्या या अंदाजित वेळापत्रकामध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षांमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ सर्व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा, व मुख्य परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट–ब व गट–क सेवा संयुक्त परीक्षामध्ये महाराष्ट्र अराजपत्रित गट–ब व गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र अराजपत्रित गट – ब सेवा मुख्य परीक्षा, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा, महाराष्ट्र गट–क सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षामध्ये महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी, अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, निरीक्षक वैद्यमापक शास्त्र मुख्य परीक्षा, राज्यसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षांचा समावेश आहे. सदर वेळापत्रक अंदाजित असून त्यामध्ये बदल होऊ शकतो. काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे उप सचिव दे.वि. तावडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

18 TO 24 DECEMBER 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/16/2023 7:56 PM Page 1



# वसईतील नयना महंत हत्याप्रकरणी ६२२ पानांचे दोषारोपपत्र दाखल






**वसई/प्रतिनिधी**

नयना महंत या तरुणीच्या हत्या प्रकरणात नायगाव पोलिसांनी वसई सत्र न्यायालयात ६२२ पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. तिचा प्रियकर मनोहर शुक्ला आणि त्याची पत्नी पूर्णिमा या प्रकरणातील आरोपी आहेत. या दोषारोपपत्रात २५ जणांचे जबाब असून मृतदेहाजवळली मोहरीचे रोप आणि ज्या बादलीत तिला बुडवले ते पाणी महत्वाचे पुरावे आहेत. सिनेमात केशभूषाकार म्हणून काम करणारी नयना महंत (२८) या तरुणीची तिचा प्रियकर मनोहर शुक्ला याने ९ सप्टेंबर रोजी हत्या केली होती. यानंतर पत्नी पूर्णिमा शुक्ला हिच्या मदतीने नयनाचा मृतदेह गुजराथच्या वलसाड येथे नेऊन टाकला होता. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी शुक्ला दांपत्याला अटक केली होती. पोलिसांनी याप्रकरणाचा तपास पूर्ण करून ६२२ पानांचे दोषारोपपत्र वसईच्या सत्र न्यायालयात दाखल केले आहे. त्यात एकूण २५ जणांचे जबाब नोंदविण्यात आले आहे. नयनाना मृतदेह बॅग मध्ये भरून शुक्ला दांपत्याने स्कूटरवरून वलासाडला नेला होता. ती बॅग लिफ्ट मधून खाली आणली होती. ते पाहणार्या सुरक्षा रक्षकाचा जबाबाचा त्यात समावेश आहे. ९ सप्टेंबर रोजी मनोहर शुक्ला याने नयना महंतची हत्या केली होती. भांडण केल्यानंतर तिचे तोंड त्याने पाण्याच्या बादलीत बुडवले होते. वैद्यकीय तपासणीमध्ये तिच्या फुफ्फुसात पाणी आढळले होते. ज्या बादतील त्याने नयनाचे तोंड बुडवले होते ते पाणी जप्त केले आहे. रासायनिक तपासणीत ते पाणी एकच असल्याचे सिध्द झाले आहे. याशिवाय नयनाच्या मृतहेहाची दुर्गंधी येऊ नये यासाठी सुटकेस मध्ये दिड किलो मोहरीच्या बिया टाकल्या होत्या. गुजराथ राज्याच्या वलसाड जवळील पार्डी येथील पार नदीच्या किनाऱ्यावर त्यांनी हा मृतदेह टाकला तर सुटकेस दुर फेकली. मोहरीच्या बियांमुळे मृतदेह कुजल्यावर दुर्गंधी येणार नाही असे त्यांना वाटले होते. त्या मोहरीच्या बिया घटनास्थळी रुजल्या आणि त्यांची रोपे उगवली होती. मोहरीच्या बियांचे रोपटे हा देखील पुरावा असल्याचे दोषारोपपत्रात म्हटले आहे. आरोपींनी टाकलेली सुटकेस काही मुलांना मिळाली होती. त्यात मोहरीच्या बिया होत्या. पोलिसांना जरी सुटकेस मिळाली नसली तरी मोहरीच्या बिया असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. त्यांचा देखील जबाब दोषारोपत्रात जोडण्यात आला आहे. ज्या दुकानातून आरोपींनी मोहरीच्या दीड किलो बिया विकत घेतल्या त्या विक्रेत्याचा जबाब घेऊन तो जोडण्यात आला आहे. याप्रकरणात पोलिसांना भक्कम पुरावे मिळाले आहेत. मोहरी आणि ज्या बादतील तिला बुडवले ते पाणी महत्वाचे ठरणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मनोहर शुक्ला याचे नयना महंत बरोबर प्रेमसंबंध होते. मात्र त्याने तिला फसवून पूर्णिमा बरोबर लग्न केले. त्यामुळे दोघांमध्ये भांडण झाले होते. मनोहरने फसवणुक केल्याने नयनाने त्याच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात बलात्काराची तक्रार दाखल केली होती. ही तक्रार मागे घ्यावी म्हणून मनोहर तिच्यावर दबाव टाकत होता. त्यामुळे त्यांची भांडणे व्हायची. त्याला कंटाळून मनोहरने तिची हत्या केली.

# वाडा येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून नेहरोली ग्रामस्थांना मार्गदर्शन!



**वाडा/प्रतिनिधी**

शासनाच्या प्रमुख योजना तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी विकसित भारत संकल्प यात्रेचे देशभरात आयोजन केले असून त्या अनुषंगाने वाडा तालुक्यातील नेहरोली ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नेहरोली ग्रामपंचायत हद्दीत विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेअंतर्गत शनिवारी (दि.९ डिसेंबर) कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये ड्रोनच्या साहाय्याने भात पीक, फळ भाज्यांवर आधुनिक पद्धतीने फवारणी कशी केली जाते हे दाखवण्यात आले त्याचप्रमाणे विकसित भारत संकल्प यात्रे दरम्यान आरोग्य विभागामार्फत टीबी, एक्स-रे, रक्तदाब तपासणी, मधुमेह आदीसह आयुष्यमान कार्ड व बँकेच्या विविध योजना बाबत माहिती देण्यात आली. उज्वला गॅस योजना व शासकीय योजना राबवण्याबाबत माहिती दिली. यावेळी सरपंच संजना गिंबल, उपसरपंच प्रथमेश भाई ठाकरे, पंचायत समिती सभापती अमोल पाटील, ग्रामसेवक संजय पाटील, सदस्य अनन्या डोहाळे, मयुरी हाडेकर, वैशाली वजरे, भीमा दिवा, अमित सुतार, प्रकाश रायात तसेच शारदा विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र मोरे, मंदाताई कांबळे यदि मान्यवर उपस्थित होते.

# विरार येथे घुबड पक्षाला मिळाले जीवनदान!



**विरार/प्रतिनिधी**

मनवेलपाडा विवा जहांगीड कॉंम्प्लेक्स येथील मुख्य नाल्यात एक घुबड जातीचे मोठा पक्षी पडला असल्याची तसेच इतर पक्षी व प्राणी त्यावर हल्ला करत असल्याचे तेथील स्थानिक रहिवाशी शशी मोरे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्वरीत प्राणी मित्रांना बोलवले पण कुठूनही सहकार्य मिळाले नाही. मोरे यांनी क्षणाचाही विलंब न करता त्वरीत शिव वाहतूक सेनेचे उपाध्यक्ष अनिल झोरे यांच्या माध्यमातून शिवसेना विरार शहरप्रमुख उदय अरूण जाधव यांच्याकडे संपर्क साधुन मदतीची विनंती केली असता त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. शिवसेना अवजड वाहतुक सेना जिल्हाअध्यक्ष आनंद चोरघे व अनिल झोरे यांच्यासह दादांनी स्व:ता उपस्थित राहुन अग्निशमन दलाच्या माध्यमातून सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनी त्या घुबड जातीच्या मुक्या पक्षीला रेस्क्यू करून पालिकेच्या अधिकारींकडे पुढील औषधोपचार साठी सुपुर्द केले.

# समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची हुल्लडबाजी, स्टंट करताना कार उलटून तरुण जखमी



**बोईसर/प्रतिनिधी**


समुद्रकिनार्यावर भरधाव वेगाने कार चालवून स्टंटबाजी करणे तरुणांच्या चांगलेत अंगलट आले. भरधाव वेगातील कारचा मागचा टायर फुटून कार उलटल्याने पाच तरुण किरकोळ जखमी झाल्याची घटना चिंचणी समुद्रकिनाऱ्यावर गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी वाणगाव पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. डहाणू तालुक्यातील चिंचणी समुद्रकिनारा पर्यटकांमध्ये चांगलाच लोकप्रिय आहे. स्वच्छ, सुंदर आणि लांबलचक किनार्यामुळे या ठिकाणी स्थानिक आणि बाहेरील पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. गुरुवारी संध्याकाळी बोईसर येथील शैलेश अमरजीत यादव (२१) हा चालक व सोबत असलेले चार तरुण आपल्या ताब्यातील अर्टिगा कार समुद्र किनाऱ्यावर (एम एच ४८ बीटी ७५२६) भरधाव वेगाने चालवून स्टंटबाजी करीत होते. या तरुणांची स्टंटबाजी सुरू असताना कारचा मागचा टायर फुटल्याने कार आंनियंत्रित होऊन उलटली. या अपघातात कारमधील तरुणांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. अपघात होताच कारमधील तीन तरुण पसार झाले. याप्रकरणी समुद्रकिनाऱ्यावर वाहन चालविण्यास बंदी असताना देखील भरधाव वेगाने वाहन चालवत रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालक शैलेश यादव याच्याविरोधात वाणगाव पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिंचणी या सुंदर समुद्र किनार्याला काही बेशिस्त आणि मद्यपी पर्यटकांमुळे गालबोट लागले आहे. किनाऱ्याकडे जाणारा रस्ता हा अतिशय अरुंद असल्यामुळे संध्याकाळी गर्दीच्या सुमारास मोठी वाहतूक कोंडी होते. समुद्र किनाऱ्यावर जाण्यासाठी मुख्य रस्त्यासोबत आणखी दोन तीन आडवळणाच्या वाटा असून काही पर्यटक या वाटांचा वापर आपली वाहने किनाऱ्यावर घेऊन जाण्यासाठी करतात. त्याच सोबत पर्यटक आपली दुचाकी आणि चारचाकी वाहने थेट समुद्रकिनाऱ्यावरील वाळूत घेऊन जाऊन स्टंटबाजी करण्याचे प्रकार वारंवार होत आहेत. लांबलचक व सपाट किनाऱ्यामुळे अनेक शिकाऊ वाहनचालकांना प्रशिक्षित करण्यासाठी या किनार्याचा नेहमीच गर्दी असते. चिंचणी समुद्रकिनाऱ्यावर मौजमज्जा करण्यासाठी आलेल्या पर्यटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी या ठिकाणी कोणतीच यंत्रणा उपलब्ध नसून स्थानिक ग्रामपंचायतीने वाहन पार्कींगचे शुल्क वसूली करण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र ठेकेदाराला न जुमानता अनेक पर्यटक बिनधास्त आपली वाहने घेऊन थेट समुद्र किनाऱ्यावर घुसखोरी करताना दिसतात.

# विरारमध्ये वीजेचा खेळ खंडोबा परिसरातील नागरीक प्रचंड त्रस्त

**विरार/प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र लग्नाचा सीझन असताना सतत विरार भागात वीज गायब होत असते. तासनतास वीज गेल्यामुळे सर्व सामान्य नागरीक त्रस्त असून घरातले इन्व्हर्टर देखील संपून जातात व वीजेअभावी नागरीकांना रोजची कामे करता येत नाहीत. विरार शहर विद्युत मंडळाने आपल्या अकार्य क्षमतेचा भाग म्हणून दर शुक्रवारी लाईट गायब केल्यावर दररोज भार नियमन सुरु केले आहेत. तासनतास वीज गेल्यामुळे घरातले गिझर चालत नाहीत. थंड पाण्याने अंघोळी कराव्या लागतात. अलिकडे नागरीकांच्या आर्थिक क्षमतेपेक्षा अधिक त्यांना दर महिन्याला वीज बिलाचा भरणा करावा लागतो. वीज बील भरण्यास दोन-चार दिवस उशिर झाला तर कोणताही वीज कर्मचारी दूरध्वनीवरुन वीज तोडण्याची धमकी देतो. त्यामुळे वीज मंडळाच्या अकार्यक्षम व सौजन्यरहित व बेजबाबदार कामगिरीचा भुर्दंड सततच्या वीज खेळ खंडोब्याने नागरीकांना भोगावा लागत आहे. अनेक सार्वजनिक कार्यक्रमात किंवा व्यवसाय उद्योगात लाईट नसल्याने संगणकावरची कामे अडतात. लोकांना सेवा देण्यास अडचणी येतात. मात्र गेले काही महिने वीज मंडळाचा कारभार संतापजनक पद्धतीने सुरु आहे. येथील तेच ते अधिकारी व अभियंता बेपर्वा झाले असून स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनीधींचा विद्युत मंडळाच्या यंत्रणेवर अंकुश राहिलेला नाही. त्यामुळे नागरीकांच्या असंतोषाचा कधीही भडका उडू शकतो.

# मीरारोड येथील अंकुश राज यांच्या हत्याप्रकरणातील आणखी एका आरोपीला अखेर ११ महिन्यानंतर अटक



**मीरारोड/प्रतिनिधी**

मीरारोडच्या जांगीड सर्कल ह्या गजबजलेल्या ठिकाणी अंकुश राज ह्या २० वर्षीय तरुणाची जानेवारी महिन्यात टोळक्याने हत्या केल्या प्रकरणी फरार असलेल्या आरोपीला ११ महिन्या नंतर पकडण्यात मीरारोड पोलिसांना यश आले आहे. ह्या गुन्ह्यात एकूण अटक आरोपींची संख्या १२ झाली असून आणखी दोघा आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. मीरारोडच्या शिवार उद्यान जवळ क्वीन्स पार्क भागात राहणाऱ्या अंकुश चा नातलग हर्ष राज याचे व आयुष भानुप्रताप सिंग (२०) रा. काशीगाव यांच्यात मीरागाव येथील पेट्रॉप पंप वर पेट्रोल भरण्याच्या नंबर वरून भांडण झाले होते. नंतर हर्ष ने आयुषला कड्याने मारल्याने तेव्हा अंकुश तेथे होता. बदला घेण्यासाठी आयुषने त्याच्या साथीदारांना बोलावून घेत एमटीएनल मार्ग व जांगीड सर्कल दरम्यान मीरा दर्शन इमारत येथील एका दुचाकी दुरुस्तीच्या गॅरेजवर अंकुश गाठले. अंकुश याला बेदम मारहाण करून चाकू ने त्याची हत्या करण्यात आली. भर सायंकाळी एका टोळीने केलेल्या ह्या हत्याकांडा मुळे खळबळ उडाली. पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी तातडीने आरोपीना पकडण्यासाठी मार्गदर्शन करत गुन्ह्याचा आढावा घेतला. त्यावेळी गुन्हे शाखा कक्ष १, मीरारोड व काशीमीरा पोलिसांनी काही तासात आयुष सह त्याच्या ९ साथीदारांना अटक केली होती. उपायुक्त जयंत बजबळे, सहाय्यक आयुक्त महेश तरडे व मीरारोड पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षकराहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक निरीक्षक संतोष सांगवीकर व रामकृष्ण बोडके, उपनिरीक्षक किरण वंजारी सह प्रशांत महाले, प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, परेश पाटील, तानाजी कौटे, शंकर शेळके, अथर्व देवरे यांच्या पथकाने ९ डिसेम्बर रोजी हत्येच्या गुन्ह्यातील १२ वा आरोपी रोहितकुमार शंकर पासवान (२४) रा. म्हाडा बिल्डींग, माशाचा पाडा, काशीमीरा ह्याला घोडबंदर मार्गावरील येणे पुला जवळून अटक केली. पासवान हा मूळचा बिहार असून तो त्याच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्याने त्यांनी सापळा रचला होता. पासवान हा अंकुश याच्या हत्ये नंतर नालासोपारा भागात वास्तव्य करत होता. आणखी दोघा आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

# 'वर्क फ्रॉम होम'च्या नावाखाली ऑनलाईन फसवणूक; भरले ८५ लाख मिळाले १८ हजार!

**वसई/प्रतिनिधी**

टेलिग्रामवर वेगवेगळ्या प्रकारचे टास्क पूर्ण करण्याचे आमिष दाखून वसईत एका इसमाला सायबर भामट्यांनी तब्बल ८४ लाखांचा गंडा घातला आहे. जगातील हॉटेलांचे नामांकन (रेटींग) केल्यास घरबसल्या पैसे मिळतील असे आमिष दाखविण्यात आले होते. फिर्यादीने तब्बल ८५ लाख भरल्यानंतर केवळ १८ हजार परत मिळाले होते. ५९ वर्षीय फिर्यादी हे वसई पश्चिमेच्या सागरशेत येथे राहतात. एप्रिल महिन्यात त्यांना जान्हवी पटेल नामक महिलेचा फोन आला होता. घर बसल्या कमवा (वर्क फ्रॉम होम) ची ऑफर या महिलेने दिली. ट्रिवॅगो कंपनीच्या संकेतस्थळावर जाऊन जगभरातील वेगवेगळ्या हॉटेल्सना नामांकन (रेंटीग) दिले तर पैसे मिळतील असे सांगण्यात आले.

२८ नामांकन केल्यानंतर प्रत्येक नामांकनानंतर ९३० रुपये घरबसल्या मिळतील असे आमिष दाखविण्यात आले. त्यानंतर फिर्यादी यांना डिलक्स रेटींग, व्हीआयपी चॅनल फी, आयकर शुल्क फी अशा विविध कारणांसाठी आधी पैसे भरावे लागतील असे सांगितले. फिर्यादीने सायबर भामट्यांनी ३२ बँक खाते दिले होते. त्यानुसार एकूण ४३ वेळी फिर्यादी या खात्यांवर ८३ लाख ९५ हजार रुपये वर्ग केली. त्यातून फिर्यादीला केवळ १८ हजार ३३० रूपये परत मिळाले. साधारण ८ महिने हा फसवणुकीचा व्यवहार सुरू होता. नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने वसई पोलीस ठाणे गाठले. वसई पोलिसांनी या तक्रारीवरून फसवणूकीच्या कलम ४२०, ३४ अन्वये फोन करणारी जान्हवी पटेल नामक महिला तसेच दोन टेलिग्रामधारकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# महापालिकेच्या सर डी एम पेटीट रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरमध्ये आग; सुदैवाने सर्व बचावले



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसईतील सर डीएम पेटिट रुग्णालयात शुक्रवारी सकाळी आग लागण्याची घटना घडली सदरची आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे समोर आले आहे.

अधिक माहितीनुसार, पारनाका येथील सर डी एम पेटीट रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर मधे स्विच बोर्डमधून आग लागल्याची माहिती व्यवस्थापनाने दिली आहे. यावेळी ऑपरेशन थिएटरमध्ये एका रुग्णावरती सर्जरी सुरू होती. रुग्णालयाच्या डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत सदर रुग्णाला बाहेर नेले. त्यामुळे कुठलीही अप्रिय घटना घडली नाही, अशी माहिती रुग्णालयाच्या व्यवस्थापिका डॉक्टर राणी बदलानी यांनी प्रसार माध्यमांना दिली. विद्युत विभागाने घटनास्थळी धाव घेत विजपुरवठा खंडित केल्याने पुढील अनर्थ टळला. यावेळी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. सदर रुग्णालय मागील काही काळापासून चर्चेत आहे. लिफ्ट बंद असणे, ओपीडी वेळा योग्य नसणे. यामुळे मध्यंतरी वादंग निर्माण झाला होता.

सदर घटनेमुळे विद्युत विभागाने सदर रुग्णालयामध्ये विद्युत उपकरणांचे सर्वेक्षण केले आहे का तसेच मागील काही वर्षांमध्ये केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेली आहेत सदरची घटना गंभीर असून ऑपरेशन थिएटरमध्ये सर्जरी सुरू असताना असा प्रकार घडल्यास ती जबाबदारी कोणाची हा प्रश्न निर्माण झाला आहे. सदरची घटना घडल्यावर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक अनिल कुमार पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी स्थळाची पाहणी करून ते माघारी परतले.

# वाडा येथे शॉक लागून वायरमनचा मृत्यू



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील गोऱ्हे येथे तुटलेली वायर जोडायला गेला असता अचानक विद्युत प्रवाह चालू झाल्याने वरिष्ट तंत्रज्ञ नरेश मधुकर गोवारी (वय ५५) यांचे दुर्दैवी निधन झाले आहे. वाडा तालुक्यातील गोऱ्हे विभागात काल वायर तुटली होती. या लाईनचा विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी गोवारी यांनी फ्यूज काढून ठेवला होता. ते जेंव्हा आज वायर जोडण्यासाठी गेले तेंव्हा त्यांच्या सोबत असलेला कर्मचारी रजेवर असल्याने ते ऐकटेच तुटलेली तार जोडायला गेले असता अचानक विद्युत पुरवठा चालू झाल्याने शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला आहे. अशा वेळी दोन कर्मचारी असणे आवश्याक असते मात्र ते ऐकटेच काम करायला का गेले व काढून ठेवलेला फ्यूज कोणी लावला याचा तपास पोलीस करत असून दोषीवर कारवाई करण्यात येईल अशी माहिती कार्यकारी उपअभियंता अविनाश कट्टकवार यांनी दिली.

# वाडा येथे भीमराव बागुल यांच्या कार्याचा गुणगौरव



**वाडा/प्रतिनिधी**

कामगारांच्या न्याय-हक्कासाठी सतत धडपडणारे व गेली कित्तेक वर्षे वाडा ग्रामीण रुग्णालयात रुग्णमित्र म्हणून सेवा देणारे भीमराव बागुल यांचा ठाणे प्रारंभ कला अॅकॅडमी यांच्या वतीने संविधान दिनी निस्वार्थ समाजसेवक म्हणून गौरव करण्यात आला. या निमित्ताने साथ मित्रांची युवा सामाजिक व शैक्षणिक संस्था यांच्या वतीने त्यांचा गांध्रे येथे सत्कार करण्यात आला. या प्रसंगी गांध्रे गावचे सरपंच रवींद्र खांजोडे, साथ मित्रांची अध्यक्ष सचिन गोळे, सामाजिक कार्यकर्ते सुजय जाधव, गवंडी बांधकाम मजूर संघटनेचे गणपत दादा कामडी, साथ मित्रांची सचिव प्रशांत कामडी, खजिनदार संदीप भोमटे, महेश गोळे, सचिन भुयाळ, अनिकेत देवळे, राजेश भोमटे, निलेश कामडी, समीर रिंजड, उमेश जाधव आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## १७ लाखांचा गुटखा जप्त

सोलापूर : कर्नाटक राज्यातून मंगळवेढा मार्गे पंढरपूरकडे बेकायदा गुटखा घेऊन जाणारा महिंद्रा पिकअप वाहन मंगळवेढा शहरा जवळील पुलाजवळ पोलिसांनी पकडून १७ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वाहन चालक संदीप रामचंद्र लाड (३६) वाहन मालक भूषण होमकर या दोघांविरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# देवणी पोलीस ठाण्याचे शंकर पाटील यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी देवणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले शंकर पाटील यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाल्या बदल देवणी खुर्द ग्रामपंचायत व मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी देवणी खुर्दचे संरपच यशंवत कांबळे, रमेश कांबळे, अकुंश पाटील, अनिल कांबळे, तुकाराम पाटील, माधव पाटे, राजू कारभारी, जितेंद्र शिवगे, भैय्यासाहेब देवणीकर, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, रतन गरड यासह अनेक जन उपस्थित होते.

18 TO 24 DECEMBER 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/16/2023 7:57 PM Page 1



# हॉटेलसमोर हिरो सारखा बसला गाडीवर काही वेळातच पोलिसांनी केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा बसस्थानकासमोर एका हॉटेल समोर गाडीवर हिरो सारखा बसलेल्या अवस्थेत पोलिसांनी एका अट्टल चोरट्याला सापळा लावून पकडलेला आहे. या कारवाई दरम्यान त्यांच्याकडून सहा मोटरसायकली जप्त केल्या आहेत. चार गाड्यांचा शोध सोलापूर ग्रामीण पोलीस घेत आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. मंगळवेढा पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यांमध्ये फिर्यादी बाळू सुरवसे हे दुचाकी घरासमोर लावून घरात झोपले असता अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली या घटनेचा तपास असताना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे १४ डिसेंबर २०२३ रोजी मंगळवेढा पोलीस ठाण्याचे अधिक तपास करीत असताना फिर्यादी बाळू सुरवसे यांची दुचाकी मंगळवेढा शहरातील एका इसमाने चोरली असून तो बसस्थानक परिसरातील हॉटेल जवळ थांबला असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी सापळा लावून त्या चोरट्या ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याच्याकडील पाच मोटरसायकली जप्त केल्या. गेल्या सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे यांच्या सहाय्यक फौजदार शिवाजी घोळवे, गायकवाड, पोलीस हवालदार रवी माने, पोलीस कॉन्स्टेबल अजब वाघमारे, सुरेश रामगुडे, प्रमोद माने यांनी पार पडलेली आहे.

# सूर्या पाणीपुरवठा योजनेत वसई आणि परिसरातील ६९ गावांना प्राधान्य द्या!

## शिवसेना आमदार तथा विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा औचित्याचा मुद्दा

**वसई/प्रतिनिधी**

वसई-विरार शहराची पाण्याची आत्यंतिक गरज लक्षा घेता; सूर्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करताना वसई आणि परिसरातील ६९ गावांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी औचित्याच्या मुद्याद्वारे आज शिवसेना आमदार तथा विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात केली. सूर्या पाणी प्रकल्प योजनेतून वसई-विरार शहराला प्रतिदिन १८५ एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात यापैकी ८५ एमएलडी पाणी एमएमआरडीएकडून देण्यात येत आहे. वसई-विरार शहराची पाण्याची आत्यंतिक गरज लक्षा घेता; सदर योजना कार्यान्वित करताना वसई आणि परिसरातील ६९ गावांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. त्याकरता ६९ गावांत अंतर्गत जलवाहिनी अंथरण्याची कामे तात्काळ करण्यात यावीत. तसेच या योजनेतील पाण्याकरता या गावांत तात्काळ नळजोडणी मंजूर करण्यात याव्यात, अशी विनंती अंबादास दानवे यांनी या प्रसंगी केली. वसई-विरार महापालिका ३ जुलै २००९ साली स्थापन झाली. त्यानंतर उपरोक्त ६९ गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली होती. मात्र या गावांना पालिकेचा पाणीपुरवठा नसल्याने या गावांतील हजारो रहिवाशांना कूपनलिकांचे क्षारयुक्त पाणी प्यावे लागत आहे. परिणामी या गावांना विविध जलजन्य आजारांना सामोरे जावे लागत असल्याकडे दानवे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची वसईतील ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची ८५ कोटी रुपयांची योजना डिसेंबर २००८ मध्ये मंजूर करण्यात आली होती. या योजनेचे १२ फेब्रुवारी २००९ रोजी भूमिपूजनही करण्यात आले होते. ही योजना पूर्णत्वास जावी, यासाठी प्रशासकीय स्तरावर अनेकदा पत्रव्यवहारही करण्यात आलेला आहे; परंतु ही योजना आजपर्यंत मार्गी लागलेली नाही. परिणामी ही सर्व गावे आजही तहानलेली आहेत. या पार्श्वभूमीवर वसई-विरार उपप्रदेशाला १८५ एमएलडी पाणी देण्यासाठी तयार झालेल्या एमएमआरडीएच्या सूर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राला बहुप्रतिक्षेत असेलला पाणी पुरवठा सुरू झाला आहे. मागील काही दिवस पाण्याच्या वितरणासह जलदाब चाचणीही शहरात सुरू आहे. त्यामुळे शहराला मोठा जलदिलासा मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात महापालिकेने ८० ते १०० एमएलडी पाणी उचलण्याचे नियोजन केले असून ते पाणी उचलले जात आहे. या अनुषंगाने शहरातील १७ जलकुंभांचे कामही पूर्णत्वास गेले आहे. ६९ गाव परिसरातील १) गास-डोंगर, २)भईगाव-खुर्द (डोंगरी), ३) भुईगाव-बुद्रुक, ४) निर्मळ-विद्यालय, ५) मर्देश-मराठी स्कूल, ६) नवाळे, ७) वाघोली, ८) नाले (तलाव), ९) राजोडी,



१०) सत्पाळा, ११) वटार आदी जलकुंभांचे कामही पूर्ण झालेले आहे. केवळ अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे सूर्या पाणी प्रकल्प योजना मार्गी लागल्यानंतर या गावांना पाणी मिळण्यास अडचण येणार आहे. ही समस्या व ग्रामस्थांची तातडीची मागणी लक्षात घेऊन या ६९ गावांत अंतर्गत जलवाहिनी अंथरण्याची कामे तात्काळ करण्यात यावीत; तसेच या योजनेतील पाणी प्रथम प्राधान्याने या गावांना मिळावे, यासाठी शिवसेना (उबाठा) आग्रही आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून अश्लील छायाचित्रे वायरल

नालासोपारा : नालासोपारामध्ये राहणाऱ्या एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीची ओळख फेसबुकवर आदित्य भगत नावाच्या तरुणाशी झाली होती. या काळात आरोपीने पीडित तरुणीशी बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. यानंतर मुलीने नकार दिल्यानंतर तिची अश्लील छायाचित्रे इन्स्टाग्रामवर प्रसारीत करुन तिची बदनामी केली होती. यामुळे या मुलीने आत्महत्या करण्याचादेखील प्रयत्न केला होता. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हे दाखल केला होता. पोलीस उपनिरीक्षक हितेंद्र विचारे आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास करून तांत्रिक विश्लेषण करून आरोपीचा माग काढला आणि त्याला भाईंदर येथून अटक केली.

# देवणी खुर्द येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन साजरा

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी खुर्द येथील बौद्ध समाज मंदिरासमोर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरीनिर्वाण दिना निमित्त प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच यशवंत कांबळे, उपसरपंच विठ्ठल शिंगडे, मनोहर पाटील, रमेश कांबळे, राजाराम पाटील, अनिल कांबळे, डॉ. सुभेदार इरफान पशुधन विकास अधिकारी देवणी, माधव रणदिवे ग्रामपंचायत सदस्य, किशन आगळे होमगार्ड, श्रावण गायकवाड, मल्लिकार्जुन रणदिवे, निवृत्ती कांबळे, वसंत रणदिवे, सुर्यकांत कांबळे, नरसिंग कांबळे, मधुकर कांबळे, सागर रणदिवे, लक्ष्मण मेह्त्रे, व्यंकट कांबळे, बाळु कांबळे, सोपान रणदिवे, अंगणवाडी



कार्यकर्ती दैवशाला कांबळे, सरोजा गायकवाड,मदतनीस हौशाबाई सारगे, अयोध्या सुर्यवंशी, लता कांबळे, पंचफुला कांबळे, भरत मेह्त्रे, ज्ञानोबा कांबळे, तुळसिदास रणदिवे, अमित देवणीकर, प्रेरक लक्ष्मण रणदिवे, प्ररिका मनिषा बिरादार व गावातील महिला पुरुष विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## 'लिव्ह इन' मधला प्रियकर हट्टाला...

प्रियकराला मात्र ती हवी होती. तो तिची पाठ सोडायला तयार नव्हता. अखेर त्या महिलेने आपल्या मुलाच्या मदतीने प्रियकराचा कायमचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपीना अटक केली आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, चार वर्षे 'लिव्ह इन' मध्ये राहणाऱ्या महिलेने प्रियकराची हत्या केली आहे. ओळखीच्या लोकांच्या मदतीने या महिलेने प्रियकराला विवस्त्र करून बेदम मारहाण केली होती. त्यानंतर त्याला शहरातील साई टेकडी परिसरात फेकून दिले होते. दुसऱ्या दिवशी लोकांना मृतदेह आढळून आल्यावर या सर्व प्रकरणाचा उलगडा झाला आहे. आनंद साहेबराव वाहुळ (वय २७ वर्षे, रा. कबीरनगर, उस्मानपुरा) असे मारहाणीत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. आनंद हा रिक्षाचालक होता. त्याचे एका ४५ वर्षीय महिलेसोबत प्रेमसंबध होते आणि ते दोघेही चार वर्षापासून 'लिव्ह इन' मध्ये राहत होते. सर्व काही सुरळीत सुरु असतानाच मागील काही दिवसांपासून दोघांमध्ये वाद सुरु झाला. त्यामुळे आनंद हा मुंबईला निघून गेला होता. मात्र, मागील आठवड्यात तो पुन्हा शहरात आला आणि येताच महिलेला भेटण्यासाठी तिच्या चिकलठाणा परिसरातील घरी गेला. त्यावेळा माझा नाद सोड, माझा मुलगा मोठा झाला आहे, त्याला ही बाब कळेल, वाद वाढतील, अशी विनंती महिलेने केली. मात्र, तरी आनंद ऐकत नव्हता. चार वर्षापासून 'लिव्ह इन' मध्ये राहणाऱ्या महिलेने आनंदला आता यापुढे आपल्याला एकत्र राहता येणार नसल्याचे सांगितले. तसेच, मला सोडून दे अशी विनंती देखील केली. पण, आनंदला हे मान्य नव्हते. शेवटी महिला व तिचा मुलगा व अन्य तीन आरोपींनी १३ डिसेंबर रोजी आनंदला विवस्त्र करून बेदम मारहाण केली. गंभीर अवस्थेत त्याला दुचाकीवर नेऊन साई टेकडी परिसरात फेकून दिले. दरम्यान, बेदम मारहाणीमुळे आनंदचा मृत्यू झाला. तर, साई टेकडी परिसरात ईव्हीनिंग वॉकिंगला गेलेल्या काही नागरिकांना मृतदेह आढळल्याने त्यांनी तात्काळ चिकलठाणा पोलिसांना घटनेची माहिती दिली. घटनेचे माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रविंद्र खांडेकर, उपनिरीक्षक योगेश खटाणे यांचे पथक घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेनदासाठी घाटीतील शवागृहात पाठवून दिला. चार वर्षे 'लिव्ह इन' मध्ये राहणाऱ्या महिलेने आनंदला यापुढे एकत्र राहता येणार नसल्याचे सांगून देखील तो यासाठी तयार नव्हता. त्यामुळे तिने इतर चार जणांच्या मदतीने आनंदला विवस्त्र करून बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला आहे.

## जमिनीच्या विक्रीवरून वाद वाढला...

ही महिला ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११च्या सुमारास गावशिवारातील स्वमालकीच्या शेतात शेंगा तोडण्यासाठी गेली होती. मात्र रात्री उशिरा ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी दुसऱ्या दिवशीही शोध घेतला. मात्र, थांगपत्ता न लागल्याने १ डिसेंबर रोजी यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. दरम्यान, गाव शिवारातीलच राजू खराटे यांच्या शेतातील उसात कचरा तसेच काचकुयऱ्या वाढल्या असल्याने मजुरांनी ऊस तोडण्यास नकार दिला. कचरा पेटविल्याशिवाय ऊस तोडणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळे सकाळी ११ च्या सुमारास ऊस पेटविण्यात आला. त्यावेळी उसामध्ये कुजलेल्या स्थितीत मृतदेह आढळला. याची माहिती मिळाल्यानंतर बेपत्ता असलेल्या महिलेच्या कुटुंबातील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. पेटलेल्या उसामुळे मृत महिलेच्या अंगावरील कपडे जळाले होते. मात्र तोरड्या व जोडव्यावरून सदर मृतदेह साधना जोगे यांचाच असल्याची ओळख पटली. मृतदेह पूर्णपणे कुजलेला असल्यामुळे जागेवरच शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी पती संजय जोगे यांनी घातपाताचा संशय व्यक्त केल्याने साधनाचा मृत्यू नेमका कसा झाला हे शोधण्याचे आव्हान ग्रामीण पोलिसांसमोर उभे होते. अखेर दिरानेच वहिनीला संपविल्याचे पुढे आले. या प्रकरणी पोलिसांनी नाना उर्फ ज्ञानेश्वर लक्ष्मण जोगे (३०) याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे. एक एकर शेती विक्रीमध्ये वहिनी अडथळा आणत असल्याने गळा आवळून ठार मारल्याचे व पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने प्रेत बाजूच्या खराटे यांच्या शेतातील उसात फेकल्याची कबुली आरोपी नाना जोगे याने दिली असल्याचे पोलिस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांनी सांगितले.

## जेवणाचे पार्सल घेण्यावरून वाद ...

मारहाण केली असून तो जखमी झाला आहे. ही माहिती मिळताच सुनिल हा सन्निधी बार या ठिकाणी पोहचला. त्याने लगेच त्याची बहिण पूजा लतेश शिंदे हिला फोन करून ही माहिती दिली. ती आपल्या काही नातेवाईकांसह तात्काळ सदर ठिकाणी दाखल झाली. अनिलची अवस्था बघून अनिलच्या डोक्याला, तोंडावर व शरिरावर इतस्त्र जखमा झाल्या होत्या. तो अर्धमेला होऊन मृत्यूशी झुंज देत होता. अनिलची अवस्था बघून त्यास उपचाराकरिता गोवंडीच्या शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र उपचारापूर्वी डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. लगेच या घटनेची माहिती चेंबूर पोलिसांना देण्यात आली. वपोनि नागराज मजगे, पो.नि. राजेद्र खेडकर व उप निरी.ओंकार मस्के इत्यादी रुग्णालयात दाखल झाले. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी करून इन्केवस्ट पंचनामा करण्यात आला .त्यानंतर मृतदेह पोस्टमोर्टम-साठी रवाना करण्यात आला. इकडे मयत अनिल धरम रणदिवे (२२) यांचा भाऊ सुनिल रणदिवे यांचा पोलिसांनी सविस्तर जबाब नोंदवून घेतला.त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरून आरोपी विरोधात गुन्हा रजि.५८२/२०२३, कलम ३०२,३४ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला.दरम्यान अनिलच्या प्रेताचे शवविच्छेदन झाल्यावर मृतदेह त्याच्या भावाच्या ताब्यात देण्यात आला.शोकाकुल वातावरणात अनिलवर अंत्यसंस्कार करण्यात आले. इकडे अनिलच्या मारेकऱ्यांचा शोध घेण्यासाठी चेंबूर पोलिसांची तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली.तपास पथकाने गुन्ह्यातील पाहिजे आरोपीचा शोध सुरू केला. घटनास्थळवरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून आरोपींची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले. मग खबऱ्या मार्फत आरोपीचा माग काढून रितिक रमण बजाज (वय २३ ), धंदा नोकरी, रा. रुम न.२९५, आर सी बॅरॅक क्र.२५ चेंबूर व हर्षद रवी वलोड्रा, (वय २७) धंदा नोकरी, रा.आरसी बॅरॅक नं .२२, चेबूर कॅम्प मुंबई या दोघांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.त्यांची अंगझडती घेऊन वापरलेले कपडे स्टिलचे कडे पंचासमक्ष जप्त केले. पोलिसांनी या दोघांकडे अनिल रणदिवे या तरुणाचा खून प्रकरणी कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची पुढील प्रमाणे कबुली दिली. मयत अनिल रणदिवे हा तरुण चेंबूरमधील सम्राट अशोक नगर येथील रहिवासीअसून तो भाऊ सुनील रणदिवे (२३)यांच्यासह राहत होता.सुनील रणदिवे याचा सजावटीचा व्यवसाय आहे.अनिल आपल्या भावाच्या कामात मदत करीत होता. दि.८ आक्टोबर रोजी रात्रौ १०. १५ च्या सुमारास अनिल चेंबूर आर.सी. मार्ग येथील सन्निधी बार येथे जेवणाचे पार्सल आणण्यासाठी गेला होता. त्यावेळी सन्निधी बार मधील तळमजल्या आरोपी रितीक बजाज व हर्षद वलोड्रा हेही उपस्थित होते.

यावेळी जेवणाचे पार्सल सन्निधी बार मधील तळमजल्या वरील काउंटर वरून अनिल घेत असताना तेथेच पार्सल घेण्यास आलेले आरोपी रितीक बजाज व हर्षद वलोड्रा यांनी पार्सल पहिले कोण घेणार? या वादातून दोन्ही आरोपींनी अनिलला हाताने लाथा बुबक्यांनी तोंजवर डोक्यावर व छातीवर मारहाण केली. त्यानंतर त्यास फरफरत ओढून बारच्या समोर आणले आणि पुन्हा लाथा बुक्क्यांनी रितिक याने हातातील कड्याने मारहाण केली. त्यामुळे अनिलच्या तोंडावर, डोक्यावर व छातींवर गंभीर दुखापत झाली. अनिल खाली कोसळला. हे बघून या दोन्ही आरोपींनी बार मधून धूम ठोकली. यावेळी अनिलच्या भावाला सुनीलला त्याच्या जवळील मित्रांने फोन करून या घटनेची माहिती दिली.तो घटनास्थळी दाखल झाला. अनिलला तत्काळ शताब्दी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. चेंबूर पोलिसांनी याप्रकरणी तत्काळ गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना ९ आक्टोबर रोजी अटक केली. गुन्हयाचा हा तपास वपोनि. नागराज मजगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि राजेद्र खेडकर व उप निरी.ओंकार मस्के यांनी मोठ्या चातुर्याने केला.

पान ८ वरून...

## पालघर येथे चक्क रुग्णवाहिकेतून ...

आला आहे. ही कारवाई पालघर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सुधाकर कदम, उपअधीक्षक बाबासाहेब भुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली व निरीक्षक शंकर आंबेरकर यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम निरीक्षक उदय शिंदे, पांडुरंग पडवळ व इतर कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## भिवंडीत विकास आराखडा विरोधात ...

प्रशासना विरोधात नागरिकांमध्ये मोठा आक्रोश असून मागील वीस वर्षापूर्वी बनविलेला विकास आराखडा अमलात न आणता स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता विकास आराखडा बनवला गेला असल्याने सर्वपक्षीय नागरिकांनी भिवंडी पालिका मुख्यालया समोर हम भिवंडीकर या संस्थेच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन केले. या आंदोलनात राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी सर्वसामान्य नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मेंदू आणि मनगटाचा विकास म्हणजे ...

तर तृतीय श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचा मल्हारी जाधव यांनी पटकावला माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक गवळी पोपट सह्याद्री माध्यमिक विद्यालय चिंचोली राव ,द्वितीय क्रमांक पांचाळ विद्यासागर स्वामी विवेकानंद विद्यालय लातूर, तृतीय क्रमांक गुडले आदित्य साने गुरुजी माध्यमिक विद्यालय लातूर यांच्या प्रयोगास मिळाला. प्राथमिक शिक्षक गटातून श्री बावलगे एनपी कुलस्वामिनी प्राथमिक विद्यालय लातूर, माध्यमिक शिक्षक गटातून श्रीमती नागीमे एस पी यशवंत विद्यालय लातूर, प्रयोगशाळा सहाय्यक गटातून श्री धिवार ए एम अनुसूचित जाती जमाती नवबौद्ध मुलांची निवासी शासकीय शाळा यांनी पटकावला सदर प्रदर्शनात अगस्त्या फाउंडेशन यशवंत विद्यालय लातूर येथील श्रीमती शेख व त्यांच्या टीमने सर्व विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे प्रयोगाचे सादरीकरण केले त्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरसिंग वाघमोडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन धनराज गीते यांनी मानले.

## अधिकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेण्याचे ...

निवृत्तीवेतन धारकांना केंद्राप्रमाणे अतिरिक्त निवृत्तीवेतन अदा करणे, सेवानिवृत्ती उपदान-मृत्यू उपदानाची मर्यादा केंद्राप्रमाणे वाढविणे, निवृत्तीवेतन, अंशराशीकरण पुनर्स्थापना कालावधी कमी करणे आणि वित्त व लेखा विभागातील सेवाप्रवेश नियमांबाबत बैठक झाली असून त्याचा निर्णय अंतिम टप्यात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंबंधात नेमलेल्या समितीने आपला अहवाल गेल्याच आठवड्यात शासनाला सादर केला आहे. यामध्ये समितीने सूचविलेल्या तरतुदी लागू करण्याकरिता त्याचा सविस्तर अभ्यास होणे आवश्यक आहे. हा अभ्यास करण्याचे निर्देश वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव, आणि सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव यांना देण्यात आले आहे. हे दोन्ही अधिकारी संघटनेच्या प्रतिनिधींशी विचार विनिमय करुन, आपले मत मुख्य सचिव यांच्यामार्फत शासनास सादर करतील. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे योग्य प्रकारे राखली जाईल, या मूळ तत्वावर शासन ठाम आहे. प्राप्त अहवाल व त्यावरील चर्चा व अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. त्या अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल. संघटनेच्या मागण्यांप्रती शासन सकारात्मक असून संघटनेने सुरु केलेला संप त्वरीत मागे घ्यावा व सर्वसामान्य जनतेची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले आहे. यासंदर्भातील निवेदन विधानपरिषदेत मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

## निवासी आश्रमशाळांमधील २८२ ...

झाल्यानंतर या शहरांमध्ये देखील उर्वरित शाळा सुरू करण्यात येतील. विद्यार्थ्यांसाठी आधार योजनेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून ६०० विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. परदेशी शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची संख्या आता ५० वरून ७५ इतकी वाढविण्यात आली असल्याचे सांगून आतापर्यत सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे प्रदान करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. सदस्य बाळासाहेब थोरात यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

## वडिल मारतील या भीतीने...

सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदरील मुली कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यातील मुस्तरी येथील असून त्यांच्या सोबत आधार कार्ड नाही, कपडे नाही, आणि पैसे पण नाहीत. त्यांचे नाव दिपा व्यंकप्पा (वय १३ वर्षे), बालीका व्यंकप्पा (१२ वर्षे), रेणुका व्यंकप्पा (वय ९ वर्षे), अनिता व्यंकप्पा (वय ८ वर्षे) सर्व रा. मुस्तरी ता. जि. गुलबर्गा येथील आहेत. त्या ४ मुली हिंदी व तामील भाषेत बोलत आहेत. कर्नाटक राज्यातून उदगीर येथे आलेल्या त्या ४ अल्पवयीन मुलींना कन्नड भाषा येत नसून ते तामील भाषेत बोलत आहेत. त्यांना ज्यास्त विचारपूस करणे शक्य होत नाही. कारण ते भीतीने भेदरलेल्या अवस्थेत आहेत. त्यांची कसून चौकशी केली तर ते पळून ज्याण्याची भीती असल्याने त्यांना हळूहळू विश्वासात घेतले जात आहे. त्या ४ मुली निवारा केंद्रात दाखल झाल्याची माहिती उदगीर शहर पोलिसांना दिलेली असून पोलिसांनी सांगितले आहे की, त्यांना निवारा केंद्रात राहू द्या. त्यांची सर्व माहिती उपलब्ध झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल, असे गौस खुर्शीद शेख (रोटी कपडा बँक) निवारा केंद्र उदगीर यांनी सांगितले. दरम्यान मी घराकडे कारणे जात असताना उदगीर बसस्थानक परिसरातील दुधीया हनुमान मंदिर समोर या चार मुली थंडीत बसलेल्या अवस्थेत आढळून आले त्या परेशान असल्याचे दिसून येताच मी त्यांच्या जवळ जाऊन त्यांची विचार पुस केली व माझ्या कारने तात्काळ त्या ४ मुलींना शहरातील बेघर निवारा केंद्रात दाखल केले. व याची माहिती उदगीर शहर पोलिसांनाही दिली, असे सुधाकर नाईक सामाजिक कार्यकर्ते, उदगीर यांनी सांगितले.

## तेजस धनागरे यांना उपराष्ट्रपती यांच्या...

आयआयटी कॉलेजमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागांमध्ये सुवर्णपदक मिळवून महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्याचा बहुमान उंचावला आहे. तेजस धनागरे यांच्या या उज्वल यशाबद्दल अजीम कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य निजामुद्दीन शेख, प्रा. बाळासाहेब कदम, प्रा.बी आर पाटील, प्रा.जाधव, काका नरसिंग भंडे (अधिक्षक अभियंता धाराशिव), आई शिवनंदा धनागरे, जयराम वाखरडे (उप अभियंता) ऐश्वर्या वाखरडे व कार्यकर्ते राम कांबळे यांनी अभिनंदन केले आहे.

## अंगद वाघमारे यांचे उपोषण तुर्तास...

उपोषणस्थळी जाऊन ते पत्र अंगद वाघमारे यांना दिले व त्यांना ज्यूस पाजवून तूर्तास उपोषण मागे घेण्याची विनंती केली यावरून वाघमारे यांनी आपले अमरण उपोषण मागे घेतले. यावेळी मोठ्या संख्येने मातंग समाजाचा जनसमुदाय उपस्थित होता.

## स्थानिक प्रशासन वसई विरार ...

अटक झाला नाही. सनसिटी येथील ११ कोटींचा स्मशानभूमी घोटाळा प्रकरणाची चौकशी होऊन आरोप खरे ठरूनही आजपर्यंत पोलिसांनी ना एफआरआय नोंदवला, ना महापालिकेच्या ठेकेदारांवर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई केली. त्यामुळेच या निषेधाच्या माध्यमातून सर्व घटनेची एफआयआर नोंदवून उच्चस्तरीय चौकशी करण्याची आम्ही मागणी करीत आहोत, असे सामाजिक कार्यकर्ते अशोक वर्मा यांनी बोलताना सांगितले.

18 TO 24 DECEMBER 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 12/16/2023 7:58 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत



### सोलातूरात दिव्यांग कर्मचाऱ्यांचा सन्मान

सोलापूर : ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सालाबाद प्रमाणे सोलापूर जिल्हा परिषद मुख्यालय, पंचायत समिती उत्तर, दक्षिण सोलापूर मध्ये कार्यरत दिव्यांग कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन उपयोगी डायरी, पेन जिल्हा कृषी अधिकारी नंदकुमार पाचकुडवे यांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, महिला अध्यक्ष अनुपमा पडवळे, उपाध्यक्ष सविता काळे, राजश्री कांगरे उपस्थित होते. याप्रसंगी प्रस्ताविक अध्यक्ष तजमुल मुतवली, सूत्रसंचालन श्रीशैल देशमुख तर आभार प्रदर्शन मनोज राठोड यांनी केले. या कार्यक्रमास दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हा सचिव लक्ष्मण वंजारी, आरती माढेकर, जयंत पाटील, प्रज्ञा कुलकर्णी, भिमाशंकर तेली, मुशीर कलादगी, रामकृष्ण पेरला पंकज वेदपाठक, सुधीर फुलारी, वीरभद्र हिरजे, राजू राऊत, हरिष म्हेत्रस संतोष निळ, शैलेश पाठक, प्रताप चव्हाण, पिराजी सुरवसे, संजय सातपुते, रवींद्र चव्हाण, अमित शहा आदी दिव्यांग कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल घोगरे, रोहित शिंदे, वर्षा आउदूर्ती, विलास मासलकर, संतोष शिंदे, राकेश सोडी, डॉ.एस.पी. माने, राजीव गाडेकर,मल्लिकार्जुन स्वामी, मिथुन भिसे, ओम कोकणे, हरूनपशा नदाफ आदींनी परिश्रम घेतले.

### भोईगल्लीतनागरी आरोग्य वर्धिनी केंद्र सुरु

लातूर : शहरातील नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य सुविधा मिळण्यासाठी महानगरपालिकेतर्फे १५व्या वित्त आयोगाअंतर्गत उपलब्ध जागेमध्ये मनपामार्फत नागरी दवाखाने चालू करण्यात येत आहेत. या अंतर्गत शहरातील भोई गल्ली परिसरात मनपाच्या वतीने नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र चालू करण्यात आले. दवाखान्याचे उदघाटन महापालिकेचे उपायुक्त रावसाहेब कोळगणे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ.महेश पाटील, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रामेश्वर कलवले, वैद्यकीय अधिकारी डॉ.मनीषा डोखळे व कर्मचारी उपस्थित होते. या दवाखान्यामुळे भोई गल्ली, कुरेशी गल्ली, दयाराम रोड, खडक हनुमान परीसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध होणार आहे.सदरील दवाखाना सुट्टीचे दिवस वगळून दररोज सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत चालू राहणार आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन लातूर शहर महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### वीरशैव लिंगायत समाजाच्या लातूरात बैठक

लातूर : २१ डिसेंबर २०२३ रोजी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे. या महामोर्चाच्या नियोजनासाठी संयोजन समितीची बैठक शनिवार दिनांक १६ डिसेंबर २०२३ रोजी वीरशैव मंगल कार्यालय, खंडोबा गल्ली लातूर येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला लातूर शहरातील संयोजन समितीचे सर्व पदाधिकारी तसेच शहरातील सर्व संस्था, मंडळे व संघटना यांच्या प्रतिनिधींनाही अमंत्रित करण्यात आले आहे. व्यापारी, डॉक्टर, वकिल, उद्योजक, प्राध्यापक व समाजाचे जाणकार तसेच ज्यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली हा महामोर्चा निघणार आहे ते शि.भ.प. शिवराज नावंदे गुरूजी व ज्यांच्या नेतृत्वाखाली हा महामोर्चा निघत आहे ते लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्यासह संयोजन समितीचे अध्यक्ष नागनाथप्पा भुरके, प्रा.वैजनाथ मलशेट्टे, प्रा.विठ्ठल आवाळे यांच्यासह अनेक मान्यवर या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तरी संयोजन समितीच्या सर्व पदाधिकार्यांना व सर्व निमंत्रित मंडळे, संस्था व संघटनांचे प्रतिनिधींनी या महत्वपूर्ण बैठकीला वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले.

### भिवंडीत वारकरी भक्त आळंदी पायी रवाना



**भिवंडी** : भिवंडी शहर व तालुक्यातील आमणे लोनाड परिसराच्या वतीने हजारोंच्या संख्येने वारकरी भक्त श्री क्षेत्र आळंदीसाठी पायी दिंडीत रवाना झाले असून पालखी सोहळ्यात पायी जाणाऱ्या हजारों वारकरी भक्तांसाठी ठाणे ग्रामीण काँग्रेस जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे तसेच डि.वाय. फाऊंडेशनच्या वतीने हजारोच्या संख्येने पायी जाणाऱ्या भक्तांनाअल्पोहार पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी वारकरी भक्तांच्या सेवेसाठी युवा नेते विरेन चोरघे समवेत डि.वाय. फाऊंडेशनच्या वतीने पायी जाणाऱ्या भक्तांना पाणी तसे जेवणाची व्यवस्था भक्तांसाठी यावेळी करण्यात आली होती.

### अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**वाडा** : पालघर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून नुकसानीचे पंचणामे करून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळण्याची मागणी होत आहे. जिल्ह्यातील इतर शेतकऱ्या प्रमाणे वाडा तालुक्यातील उमरोठे गावातील शेतकरी सुनिल पाटील यांचे देखील रस्विवाराच्या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. संयकाळच्या सुमारास अचानक कोसलेल्या पावसामुळे त्यांच्या खळ्यात असलेल्या भात भिजले आहे तर खरीप पिक व भाज्यांची रोपे कोलमडून पदल्यने मोठे नुकसान झाले आहे.तर त्यांच्या शेतातील जवळपास पाच, सहा झाडे उन्मळून पडली आहेत. हिच परिस्थिती इतर शेतकऱ्यांची झाली असून त्यांच्या कडूनही नुकसान भरपाईची मागणी होत आहे.

# महिलांच्या गळ्यातील गंठण चोरणाऱ्या दोघांना अटक; ५ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त




**लातूर/प्रतिनिधी**

महिलांच्या गळ्यातील गंठण चोरणाऱ्या टोळीला दोन गंठण चोरांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या चोरट्याकडून चोरीच्या चार मोटारसायकलसह अटक. ५ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल शिवाजीनगर पोलिसांनी जप्त केला आहे. एक महिला राजीव गांधी चौक परिसरातून सकाळी भाजीपाला खरेदी करून घरी जात असताना दोन अज्ञात मोटरसायकल स्वराने त्या महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण हिसकावून नेहल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे येथे गुरनं ५८१/२०२३ कलम ३९२,३४ भादवी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होते. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी निर्देशित करून महत्त्वाच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांचे नेतृत्वात उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय लातूर शहर व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अंमलदार यांचे तपास पथक नेमुन तपासा बाबत सूचना देण्यात आले होते. तपासा दरम्यान पोलीस पथक गुन्ह्याची पद्धत व इतर बाबींचा विश्लेषण करून तसेच गोपनीय बातमीदार नेमून माहिती मिळवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होते. दरम्यान तपास पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारावरून संशयित आरोपीचा पुणे, हडपसर, टेंभुर्णी निलंगा व लातूर शहरातील विविध भागात शोध घेऊन दिनांक २६/११/२०२३ रोजी आरोपी नामे सुशील सुनील नाथभजन, वय १९ वर्ष, राहणार राजे शिवाजीनगर लातूर. आकाश उर्फ महेश रमेश टेळे, वय २५ वर्षे, राहणार राजे शिवाजीनगर लातूर एक विधी संघर्ष बालक यांना त्यांचे राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनीच नमूद गुन्ह्यातील महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावून चोरी केल्याचे कबूल केले तसेच पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतूनही एका महिन्याचे गंठण चोरल्याचे कबूल करून लातूर शहरातील विविध भागातून काही मोटारसायकली चोरल्याचेही कबूल केले आहे. नमूद आरोपींनी चोरलेले दोन सोन्याचे गंठण व चार मोटारसायकली असा एकूण ५ लाख २९ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपींचाकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक पोगुलवार व पोलीस अमलदार धैर्यशील मुळे करीत आहेत. नमूद तपास पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय कुशलतेने, गुन्ह्याच्या पद्धतीचा बारकाईने विश्लेषण व अभ्यास करून, गोपनीय माहिती मिळवून गुन्ह्यात चोरीस गेलेले सोन्याचे गंठण परत मिळविले आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांचे व उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांचे नेतृत्वातील टीम मधील सहाय्यक उपनिरीक्षक रामचंद्र ढगे, भीमराव बेल्हाळे, पोलीस अंमलदार युवराज गिरी, संजय कांबळे, महेश पारडे, गोविंद चामे, अभिमन्यू सोनटक्के, बालाजी कोतवाड, बळवंत भोसले, प्रशांत ओगले, विनोद चालवाड, काकासाहेब बोचरे, अमित लहाने यांनी चोरीच्या गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण तपास करून गुन्ह्याची उकल करून गुन्हा उघडकीस आणून, गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल हस्तगत करण्याची कामगिरी बजावली आहे.

## देवणी तालुक्यातील संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन सुरुच; सर्वच कामे खोळंबली!



**देवणी/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा किमान २० हजार रुपये मासिक मानधन देण्याच्या मागणीसाठी १७ नोव्हेंबरपासून ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कामगार मजूर, शालेय विध्यार्थी, शेतकरी, व्यापारी, वर्गाची अडचण होत आहे. मागील १२ वर्षापासून संगणक परिचालक ग्रामपंचायतींमधून ग्रामस्थांना सेवा पुरवत आले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व २० हजार रुपये मासिक मानधन देण्याच्या प्रमुख मागणीसाठी संगणक परिचालक आक्रमक झाले आहेत. त्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात तालुक्यातील सर्व गावांतील संगणक परिचालकांनी सहभाग नोंदविला आहे. दरम्यान संगणक परिचालकांच्या आंदोलनामुळे जन्म-मृत्यू नोंद, विवाह नोंद, मिळकत नोंद, आयुष्यमान योजना, पीक विमा, आपले सरकार सेवा, तहसील प्रमाणपत्र आदी कागदपत्रांसाठी ग्रामस्थांची अडचण होत आहे. ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाने काहीतरी मार्ग काढवे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## जिल्हास्तरीय सामाजिक न्याय समितीच्या सभेत सामाजिक अंकेक्षणाचा आढावा!

**लातूर/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमता मंत्रालय यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी या योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा जिल्हास्तरीय सामाजिक न्याय सभेत आढावा घेण्यात आला. उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. बाल कल्याण समितीचे अध्यक्ष आर. डी. देशमुख, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी आदी यावेळी उपस्थित होते. मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांच्याकडून लातूर जिल्ह्यात माहे नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये इंटिग्रेटेड रिहाबिलेशन सेंटर फॉर डिक्ट अंतर्गत लातूर येथील जीवन रेखा प्रतिष्ठान आणि पंचशील व्यसनमुक्ती व उपासचार केंद्र, खाडगाव येथील श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मुक्तिगरम व्यसनमुक्ती केंद्र, लातूर येथील रेसिडेन्शियल स्कूल अंडर श्रेष्ठा अंतर्गत संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कुल, भारत मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी (एनजीओ), तसेच सीनियर सिटीजन होमस अंडर एव्हीवायएवाय अंतर्गत उदगीर, निडेबन येथील ज्ञाना शिक्षण संस्था व निलंगा तालुक्यातील कासारशिरसी येथील एकता बहुउद्देशीय महिला मंडळ या संस्थेचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आले. या अंकेक्षणाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय सामाजिक न्याय सभा १३ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. सामाजिक अंकेक्षण करण्यात आलेल्या संस्थांचे अहवाल वाचन सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीचे जिल्हा साधन व्यक्ती वैभव वटाणे, मोहन घागळे, तसेच शिलवंत धुळे यांनी बैठकीत सादर केले. सामाजिक अंकेक्षण अहवालाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी अहवालातीलल त्रुटीवर आवश्यक कार्यवाही विहित कालमर्यादेत करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

## वलांडी येथील आयुब सौदागर सह अनेक कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील सौदागर फार्म हाऊस येथे १३ नोव्हेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीचा पक्ष प्रवेश सोहळा छोटाखाणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयुब सौदागर यांनी पक्ष प्रवेश केला, तर या पक्ष प्रवेश सोहळ्यात देवणी तालुक्यातील अनेक युवकांनी वंचित बहुजन आघाडी पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नूतन जिल्हा अध्यक्ष सय्यद सलीम,जिल्हा महासचिव डॉ.तातेराव वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष अॅड. रोहित सोमवंशी, जिल्हा संघटक सचिन लामतुरे, महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा मंजुषाताई लिंबाळकर, महासचिव भारतबाई कदम, जिल्हा युवा आघाडी जिल्हा अध्यक्ष युवराज जोगी, जिल्हा युवा महासचिव नितीन गायकवाड, महासचिव व्यंकट भीमराव सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेकांनी वंचित बहुजन आघाडी पक्षात प्रवेश केला. देवणी तालुक्यात वंचित बहुजन आघाडीकडे तरुणांचा कल वाढला आहे.

## रामेश्वर येथील श्री संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी लातूर तालुक्यातील मौजे कासार जवळा रामेश्र्वर परिसरात उभारण्यात येत असलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड अॅग्रो फूड इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ गुरुवार १४ डिसेंबर रोजी विधिवत पूजन करून करण्यात आला यावेळी कारखाना परिसरातील ऊस उत्पादकासह शेतकरी हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लातूर तालुक्यातील लातूर-कळंब रोडवरील कासार जवळा-दिंडेगाव रस्त्यावर कासार जवळा रामेश्वर परिसरात श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड अॅग्रो फूड इंडस्ट्रीज या साखर कारखान्याची उभारणी गेल्या काही दिवसापासून युद्धपातळीवर सुरू आहे. या कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन तुळशीरामअण्णा कराड, व्हाईस चेअरमन राजेश कराड यांच्यासह काशीरामनाना कराड, अनिल कराड, भाजपाचे ऋषिकेश कराड, अनिल भिसे, नवनाथ भोसले, डॉ. बाबासाहेब घुले, अॅड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, सतिश आंबेकर, वसंत करमुडे, अनंत चव्हाण, गोविंद नरहरे, गोपाळ पाटील यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. शेड उभारणी कार्यक्रमात उपस्थित ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या शेअर्सची रक्कम दोन टप्प्यात घेण्याची मागणी केली असता चेअरमन तुळशीरामअण्णा कराड आणि व्हाईस चेअरमन राजेश कराड यांनी सदरील मागणी मान्य केली. शेअर्स रक्कम २५ हजार रुपये असून त्यापैकी पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये जमा करावेत उर्वरित १५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कपात केली जाईल असे सांगून यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना राजेश कराड यांनी १५ हजार रुपये इतर कारखान्याप्रमाणे कर्ज असणार नाही अथवा त्यावर कुठलीही व्याजाची आकारणी केली जाणार नाही अशी माहिती दिली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेअरची रक्कम दोन टप्प्यात घेतली जाणार असून गरजवंत शेतकऱ्यांनी पंधरा दिवसात दहा हजाराचा पहिला टप्पा देऊन सातबारा, स्टॅम्प पेपर, आधार कार्ड, फोटो जमा करून शेअर्स नोंदणी करावी असे आवाहन याप्रसंगी व्हाईस चेअरमन राजेश कराड यांनी केले. शेड उभारणी कार्यक्रमास भैरवनाथ पिसाळ, सुधाकर गवळी, विश्र्वास कावळे, राजकिरण साठे, रमाकांत फुलारी, शाम वाघमारे, काशिनाथ ढगे, ज्ञानेश्र्वर जुगल, पद्माकर होळकर, आदिनाथ मुळे, नाथराव कराड, रशीद पठाण, भरत कराड, बालाजी गवळी, प्रशांत शिंदे, अल्ताफ शेख, विकास सरवदे यांच्यासह कारखाना परिसरातील शेतकरी ऊस उत्पादक हितचिंतक उपस्थित होते.

## भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांचा वाढदिवस लातूरच्या मातोश्री वृद्धाश्रमात साजरा




**लातूर/प्रतिनिधी**

भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तथा धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांचा वाढदिवस माझं लातूर परिवाराच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमातील ६० आई-बाबांना थंडीपासून बचावासाठी ब्लँकेट देऊन उत्साहात साजरा करण्यात आला. आपल्या हटके आणि परिणामकारक सामाजिक आंदोलनामुळे देशभरात नावलौकिक असलेल्या तृप्ती देसाई या माझं लातूर परिवाराच्या हितचिंतक आहेत. माझं लातूरच्या संविधान उद्देशीका उपक्रमास त्यांनी राज्यभर चालना देण्यासाठी प्रयत्न केले. काल त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मातोश्री वृद्धाश्रमातील आई बाबांना ब्लँकेट वितरित करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे शांताराम साठे, सतीश तांदळे, विष्णु आष्टीकर, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, झाकीर सय्यद यांच्यासह वृद्धाश्रमातील कर्मचारी उपस्थित होते.

## वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली महिलेची फसवणूक, ५ दिवसांत महिलेने गमावले १६ लाख!

**विरार/प्रतिनिधी**

करोना काळात सुरू झालेली 'वर्क फ्रॉम होम' पद्धत सायबर ठकसेनांना चांगलीच पर्वणी ठरली आहे. वर्क फ्रॉम होम अर्थात घरातून काम करून कमवा अशा भूलथापा मारून लोकांना गंडविण्याचे प्रकार वाढले आहेत. विरारमध्ये राहणार्या एका महिलेला अशीच भूलथाप मारून १६ लाखांना गंडा घातला आहे. या प्रकरणातील ४६ वर्षीय महिला ही विरार पश्चिमेला राहते. १८ नोव्हेंबर रोजी तिने इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर एक जाहिरात पाहिली होती. घर बसल्या काम करा (वर्क फ्रॉम होम) आणि महिन्याला हजारो रुपये कमवा अशी ती जाहिरात होती. मात्र ती जाहिरात फसवी असल्याचे फिर्यादी महिलेला समजले नाही. तिने जाहिरातीला क्लिक केल्यानंतर ४ वेगवेगळ्या इन्स्टाग्राम आयडीच्या लोकांनी तिच्याशी मेसेजेसद्वारे संपर्क केला. टेलिग्रामवरील टास्क पूर्ण केल्यानंतर तुम्हाला भरपूर पैसे मिळतील असे सांगितले. फिर्यादी महिला या भूलथापांना बळी पडली. आरोपींच्या सांगण्यानुसार ती टास्क पूर्ण करत गेली आणि त्यासाठी विविध शुल्क भरत गेली. १८ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या पाच दिवसांत महिलेने तब्बल १५ लाख ९६ हजार रुपये सायबर ठकसेनांना पाठवले. मात्र तिला कसलाच परतावा मिळाला नाही. उलट तिने भरलेल्या सुमारे १६ लाख रुपयांपैकी एकही रुपया मिळाला नाही. यानंतर सर्व आयडी बंद झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर या महिलेने सोमवारी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ४ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नागरिकांनी कुठल्याही भूलथापांना बळी पडू नये. अधिकृत कंपन्यांच्या संकेतस्थळांशीच व्यवहार करावा. त्याआधी खात्री करून घ्यावी अशी माहिती सायबर गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुजित गुंजकर यांनी दिली आहे.

18 TO 24 DECEMBER 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/16/2023 7:58 PM Page 1



# पालघर येथे चक्क रुग्णवाहिकेतून दारूची तस्करी



**बोईसर/प्रतिनिधी**

दमण बनावटीची दारू महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे आणण्यासाठी तस्करांकडून विविध क्लृप्त्या लढवल्या जात आहेत. अशाच एका घटनेत मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रुग्णवाहिकेतून करण्यात येणारी दारूची तस्करी उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने गुरुवारी उघडकीस आणली. या कारवाईत जवळपास नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून कारवाईची कुणकुण लागताच रुग्णवाहिकेचा चालक पसार झाला आहे. प्रकरणी दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पालघर येथे रुग्णवाहिकेतून चक्क अवैध मद्याची वाहतूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. उत्पादन शुल्क विभागाने राष्ट्रीय महामार्गावर वाडा-खडकोना नजीक अवैध मद्य वाहतूक करणाऱ्यांवर केलेल्या कारवाई हा प्रकार उघड झाला असून या कारवाईत रुग्णवाहिकेसह दमन बनावटीचा ९ लाख ३४ हजार १२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रात परराज्यातून अवैधरित्या मद्याची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वाडा-खडकोना गावाच्या हद्दीत स्वागत यूनाइटेड पेट्रोल पंपच्या पार्किंगच्या जागेत संशयितरित्या उभ्या असलेल्या एका रुग्णवाहिकेची उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने तपासणी करत झाडाझडती घेतली. यात रुग्णवाहिकेची तपासणी धक्कादायक प्रकार उघड झाला. रुग्णवाहिकेच्या मागील बाजूस बसण्याकरता तयार केलेल्या दोन लाकडी बॉक्सची आसने आणि स्ट्रेचर असल्याचे आढळून आले. बसण्यासाठी असलेले आसने आणि चालकाच्या सीटच्या मागे तयार केलेल्या कप्प्यामध्ये दमण बनावटीचा अवैध मद्यसाठा आढळून आला. या रुग्णवाहिकेतूनच छुप्या पद्धतीने अवैधरित्या परराज्यातून मद्याची वाहतूक केली जात होती. या रुग्णवाहिकेतून सात बॉक्स ८४ बाल्क लिटर दमण बनावटीचा अवैध मद्यसाठा आढळून आला. उत्पादन शुल्क विभागाने रुग्णवाहिकेसह ९ लाख ३४ हजार १२० रुपये किमतीचा अवैध मद्यसाठा जप्त केला आहे. या प्रकरणी रुग्णवाहिका चालकाविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात ...पान ६ वर

# भिवंडीत विकास आराखड्याविरोधात पालिकासमोर सर्व पक्षीय धरणे आंदोलन




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिकेने विकास आराखडा सादर केल्या नंतर त्या विरोधात अनेकांनी नाराजी व्यक्त करण्यास सुरवात केली.हा विकास आराखडा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना उध्वस्त करणारा असल्याची ओरड केली जात आहे.तो आक्रोश व्यक्त करण्यासाठी हम भिवंडीकर या संस्थेच्या नेतृत्वाखाली पालिका मुख्यालया समोर धरणे आंदोलन करीत या विकास आराखड्यास विरोध दर्शवला आहे. या विकास आराखड्यास स्थानिक खासदार आमदार यांसह सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी सुद्धा विकास आराखड्यास विरोध करीत रद्द करण्याची मागणी केली होती. तर या विकास आराखडा विरोधात तब्बल ८६३४ हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. विकास आराखडा बनविणाऱ्या भिवंडी महापालिका ...पान ६ वर

# भाजप जिल्हा उद्योग आघाडीत रामलिंग मदने यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी**

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या ६८व्या जयंतीनिमित्त रामलिंग मदने यांची भाजप जिल्हा उद्योग आघाडीपदी निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांचा भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सुबोध बेळंबे, रवी सुडे, गौरव मदने, दशरथ सलगर, धनंजय हाके, देवा गडदे, काकासाहेब गडदे, अनिल पुजारी, प्रकाश काळे, अॅड. अभिजीत मदने, अॅड. सचिन मदने, अॅड. वैभव काळे, सतीश ठाकूर, धनराज मदने, गोविंद मदने आदीसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक प्रशासन वसई विरार शहराला जंगल राज बनवीत आहे - अशोक वर्मा

**वसई/प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षापासून वसई विरार महापालिका क्षेत्रात अनेक बेकायदेशीर कामे होत आहेत. मात्र याबाबत महापालिकेकडे अनेक वेळा तक्रारी करूनही महापालिका बिल्डर आणि कंत्राटदार यांना पाठीशी घालीत आहे. भ्रष्टाचाऱ्यांना साथ देण्याची महापालिकेची ही वृत्ती वसई विरारला जंगल राज बनवत आहे अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्ते अशोक वर्मा यांनी व्यक्त केली आहे. वसई पश्चिम येथील न्यू विणा सहकारी गृहनिर्माण संस्था योग्य प्रक्रियेचा अवलंब न करता बेकायदेशीरपणे पाडण्यात येत असल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते अशोक वर्मा यांनी १३ डिसेंबर पासून वसईच्या परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे.




प्रसार माध्यमांशी बोलताना आंदोलन करते अशोक वर्मा यांनी सांगितले की न्यू विणा गृहनिर्माण सहकारी संस्था योग्य प्रक्रियेचा अवलंब न करता बेकायदेशीरपणे पाडण्यात येत आहे. या इमारतीत राहणाऱ्या लोकांच्या वैयक्तिक मालमत्ता काही गुंड आणि समाजकंटकांकडून धमकावून बळजबरीने आणि कोणतीही माहिती, पावती किंवा पंचनामा न करता बळकवली जात आहे. स्थानिक नागरिकांशी बोलल्यावर असे दिसून आले की लोक घाबरले आहेत. पोलीस प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची आशा नाही. स्थानिक नागरिकांच्या स्थावर मालमत्तेवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्याचा हा खेळ वसई विरार मध्ये गेल्या अनेक वर्षापासून सुरू असून त्याचा थेट फायदा बिल्डरला होत आहे.

या अगोदरही २०१६मध्ये वसई पश्चिम येथील रेल्वे फलाट क्रमांक एक जवळची घटना घडली होती. त्यात १८ जण जखमी झाल्याचे नोंदवण्यात आला. मात्र स्थानिक प्रशासनाने कोणावरही कारवाई केली नाही. तसेच कोर्टात चार सीट दाखल केली नाही किंवा यातील एकही आरोपी ...पान ६ वर

# तेजस धनागरे यांना उपराष्ट्रपती यांच्या हस्ते आयआयटी कॉलेजचे सुवर्णपदक



**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील अजीम कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. नरसिंग धनागरे यांचे सुपुत्र तेजस नरसिंग धनागरे यांना भारतीय प्रौद्योगीकी संस्थान, भारतीय खनि विद्यापीठ धनबाद झारखंड अंतर्गत आयआयटी इंजीनियरिंग अभ्यासक्रमाचे सुवर्णपदक देशाचे महामहीम उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या हस्ते धनबाद झारखंड येथे प्रदान करण्यात आले. यावेळी झारखंड राज्याचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन, झारखंड राज्याचे आरोग्यमंत्री बन्ना गुप्ता, आयआयटीचे चेअरमन प्रो. प्रेम व्रत आणि निदेशक जे के पटनायक आदी मान्यवर उपस्थित होते. तेजस धनगरे याने धनबाद येथील ...पान ६ वर

# मेंदू आणि मनगटाचा विकास म्हणजे शिक्षण-डॉ.भागिरथी गिरी



**लातूर/प्रतिनिधी**

आव्हानं ही माणसाला बलवान बनवतात. प्रयोगातून माणसाचा संयम वाढीस लागतो. त्यातूनच मेंदू आणि मनगटाचा विकास होतो, असे प्रतिपादन डायटच्या प्राचार्या डॉ.भागीरथी गिरी यांनी केले. त्या येथील यशवंत विद्यालयात आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी बोलत होत्या. शिक्षण विभाग पंचायत समिती लातूर व यशवंत विद्यालय लातूर, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दिनांक ११ व १२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर विज्ञान प्रदर्शनात एकूण ९० प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले सदर प्रदर्शन पाहण्यासाठी परिसरातील विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.काल सदर प्रदर्शनाचा समारोपाचा कार्यक्रम यशवंत विद्यालय लातूर येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका डॉ सुवर्णा जाधव प्रमुख पाहुणे डॉ भागीरथी गिरी प्राचार्य डायट लातूर सहाय्यक, गटविकास अधिकारी किरण कोळपे, स्वप्निल मनाळे सदस्य शि.शिक्षण संस्था लातूर निशिकांत मिरकले विषय सहाय्यक विज्ञान तसेच संजय पंचगले गटशिक्षणाधिकारी लातूर, निवृत्ती जाधव, धनराज गीते शि.विस्तार अधिकारी, रविंद्र पाटील विज्ञान प्रमुख लातूर दयानंद कांबळे पर्यवेक्षक यशवंत विद्यालय लातूर उपस्थित होते दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण श्री शिवलिंग नागापुरे जि.प. प्रशाला भादा औसा, श्रीमती अनुराधा ठोंबरे जि. रेणापूर श्री खंदाडे व्यंकोबा बी.आर.सी रेणापूर प्रा. मोगरगे एस जी प्रा. डॉक्टर बालाजी हजारे प्रा. यशवंत पाटील प्रा. तनवीर मुलतानी यांनी केले उच्च प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक श्री देशिकेंद्र विद्यालय लातूरचा विद्यार्थी यश जाधव, द्वितीय क्रमांक अभिषेक कलशेट्टी पोद्दार इंटरनॅशनल स्कूल लातूर ...पान ६ वर

# जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर/प्रतिनिधी**

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिली. यासंदर्भात निवेदनाद्वारे माहिती देताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यावर अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले असून मुख्य सचिवांमार्फत त्याबाबतचे मत शासनाला सादर करण्यात येईल. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे योग्य प्रकारे राखली जाईल, या मूळ तत्वावर शासन ठाम आहे. शासनाला प्राप्त झालेला अहवाल व त्यावरील चर्चा आणि अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. त्यामुळे या अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय



अधिवेशनात घेण्यात येईल, अशी ग्वाही देतानाच अधिकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. राज्यातील राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी समन्वय संघटनांच्या विविध मागण्यांसदर्भात बैठक घेण्यात घेण्यात आली. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आमदार, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात यापूर्वी शासनाने नेमलेल्या सुबोधकुमार समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. त्यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. अधिकारी, कर्मचारी संघटनेने ज्या मागण्या केल्या होत्या, त्यावर महत्वपूर्ण असे सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहे.

संघटनांच्या मागणी नुसार राज्य शासनाने महत्वाचे पाच निर्णय घेतले आहेत त्याची माहिती देताना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, ३१ मे २००५ पूर्वी जाहिरात दिलेल्या अधिसूचित केलेल्या पदांवरील नियुक्त्यांना म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अंतर्गत समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येणार असून त्याचा लाभ सुमारे २६ हजार अधिकारी, कर्मचाऱ्यांना होणार आहे. यासोबतच ८० वर्षावरील ...पान ६ वर

# निवासी आश्रमशाळांमधील २८२ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू - अतुल सावे

**नागपूर/प्रतिनिधी**



राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत एकूण ९७७ खासगी अनुदानित आश्रमशाळा चालविण्यात येतात. या आश्रमशाळांना शालेय पोषण, इमारत भाडे आणि वेतन अशा तीन भागात अनुदान देण्यात येत आहे. यावर्षी २२५ कोटी रुपयांच्या तरतुदीपैकी आतापर्यंत १८० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. या आश्रमशाळांमध्ये एकूण २ लाख २३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये विज्ञान आणि गणित विषय शिकविण्यासाठी २८२ पदे भरण्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. सदस्य विकास ठाकरे यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रिक्त पदे भरण्याबाबत विचारलेल्या प्रश्नाबाबत मंत्री श्री. सावे म्हणाले की, सर्व आश्रमशाळांमधील रिक्त पदे त्वरीत भरण्यात येतील. येत्या जानेवारी पर्यंत राज्यात ५२ वसतिगृहे सुरू करण्यात येणार असून मोठ्या शहरात भाडे अधिक असल्याने ते वाढवून मिळण्यास शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. ती मान्य ...पान ६ वर

# अंगद वाघमारे यांचे उपोषण तुर्तास मागे

**लातूर/प्रतिनिधी**

मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे लहुजी सेना संस्थापक अध्यक्ष अंगद वाघमारे गेली आठ दिवसापासून बेमुदत आमरण उपोषण करत होते. पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या लेखी आश्वासनानंतर मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत लवकरच बैठक लावू, असे पत्र दिल्यामुळे अमरण उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले आहे. या आमरण उपोषण दरम्यान अंगद वाघमारे यांची तब्येत खूप खालावली होती. दरम्यान जिल्हा व राज्यभर पसरल्याने त्यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी विविध सामाजिक संघटना, समाज बांधव व वेगवेगळ्या पक्षाच्या वतीने नेते, पदाधिकारी भेट देत होती. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये वाघमारे यांचे उपोषण सोडण्यासाठी सरकारने व पालकमंत्री म्हणून गिरीश महाजन यांनी लक्ष



घालावे म्हणून त्या ठिकाणी प्रश्न मांडला असता गिरीश महाजन यांनी अंगद वाघमारे यांना लेखी पत्र देऊन तूर्तास आमरण उपोषण मागे घ्यावे मी, मुख्यमंत्री आणि स्थानिक आमदार अमित देशमुख तसेच आपले शिस्तमंडळ यांची लवकरच मंत्रालय मुंबई येथे आपल्या मागण्याबाबत बैठक लावतो, असे आशयाचे पत्र जिल्हा अधिकारी मार्फत निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्याकडे पाठवले व ढगे यांनी ...पान ६ वर

# वडिल मारतील या भीतीने कर्नाटकातील चार अल्पवयीन मुली पोहोचल्या उदगिरात!

**देवणी/शकील मनियार**

कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यातील मुस्तरी येथील पित्याकडून पोटाच्या ४ अल्पवयीन मुलींना अमानुषपणे मारहाण नेहमी करण्यात येत असल्याने या मारहाणीत आपला जीव जाणार की काय? या भीतीने घाराबाहेर पडलेल्या ४ अल्पवयीन मुली थंडीने काकडत असताना मंगळवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास उदगीर येथील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात आढळून आल्या. रात्रीची वेळ कडाक्याची थंडी ४ अल्पवयीन मुली भुकेने त्रस्त असलेल्या निवाऱ्याच्या शोधत बसस्थानक परिसरात इकडून तिकडे फिरत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सुधाकर नाईक यांच्या निदर्शनास आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्या ४ मुलीजवळ जाऊन त्यांना त्यांची सर्व हकीकत विचारण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना मराठी भाषा येत नसल्याने अडचण निर्माण झाली. त्या ४ अल्पवयीन मुली थंडीने काकडीत होती. प्रारंभी त्यांचे थंडीपासून बचाव व जेवणाची व्यवस्था लवकर व्हावी या उद्देशाने नाईक यांनी त्यांच्या कारमध्ये बसवून उदगीर येथील सलात अल्पसंख्याक सेवाभावी संस्था उदगीर द्वारा संचलित शहरी बेघर निवारा केंद्रात दाखल केले. निवारा केंद्रात त्या ४ अल्पवयीन मुलींना सर्व प्रकारची सोयी ...पान ६ वर